




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १७९ * नांदेड * मंगळवार, दि. ७ जुलै २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# मुसळधार पावसामुळं जनजीवन विस्कळीत, राज्यात आत्तापर्यंत ९ जणांचा बळी, तर ४ जण जखमी

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुंबईसह ठाणे, पालघर त्याचबरोबर कोकणात मुसळधार पाऊस कोसळत आहे. या पावसामुळं काही भागात जनजीवन विस्कळीत झालं आहे. कारण अनक ठिकाणी रस्त्यांवर घरांमध्ये पाणी शिरलं आहे. दरम्यान, या मुसळधार पावसामुळं काही भागात दुर्घटना देखील घडल्या आहेत. मुसळधार पावसामुळे झालेल्या दुर्घटनेत आत्तापर्यंत राज्यात ९ जणांचा बळी गेला आहे. तर ४ जण जखमी झाले आहेत. भिंत पडून ८ जणांचा बळी तर झाड पडून एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.



मुंबई उपनगरात भिंत पडून ६ जण, पुण्यामध्ये एक जण तर ठाण्यामध्ये एक जणाचा भिंत पडून मृत्यू झाला आहे. तर मुंबई उपनगरामध्ये झाड पडून आणखी एकाचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. गेल्या तीन ते चार दिवसापासून मुसळदार पाऊस सुरु आहे. या पावसाचा मोठ्या प्रमाणात फटका सामान्य नागिकांना बसला आहे, अनेक ठिकाणी रस्त्यांना नदीचं स्वरुप आल्याचं पाहायला मिळत आहे. त्यामुळं वाहतुकीवर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला आहे.

मुंबईतील मानखुर्द भागात एका तीन मजली चाळीचा भाग कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली आहे. धोकादायक असलेली ही चाळ रिकामी करण्यासाठी घरातील सामान आवरत असतानाच अचानक पावसाने घात केला आणि संपूर्ण घर कोसळले. या ढिगाऱ्याखाली गाडले गेल्यामुळे ५ निष्पाप लहान मुले आणि एका महिलेसह ६ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. दरम्यान, या घटनेप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन जणांना अटक करण्यात आली आहे.

पालघर जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरु असून नदी नाले ओसांडून वाहायला सुरुवात झाली आहे. तर जिल्ह्यातील वैतरणा तानसा सूर्या देहेरजा पिंजाळ या नद्यांना मोठ्या प्रमाणात पूर आला असून तानसा नदीने आपली धोक्याची पातळी ओलांडलेली आहे तर वैतरणा नदी धोक्याच्या पातळीवर असून नदी काठावरील गावांमध्ये या नदीचे पुराचे पाणी शिरायला सुरुवात झाले आहे. जिल्हा प्रशासनाकडून नदी काठावरील गावांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे. वैतरणा नदीला मोठा पूर आला आहे.

आळंदीत आज सकाळपासून मुसळधार पावसाने हजेरी लावली होती. मात्र, आता पावसाचा जोर काहीसा ओसरला असून सध्या रिमझिम पाऊस सुरू आहे. सततच्या पावसामुळे इंद्रायणी नदी दुथडी भरून वाहत असून मंदिर परिसरातही पाणी साचले आहे. दरम्यान, संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या उद्या आणि परवा पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान करणार असल्याने आळंदीत हजारो वारकरी दाखल झाले आहेत. पार्श्वभूमीवर प्रशासनाने वारंवार आवाहन करत कोणत्याही परिस्थितीत इंद्रायणी नदीच्या पात्राजवळ किंवा घाट परिसरात जाण्याचा प्रयत्न करू नये, असे सांगितले आहे. याशिवाय, मुख्यमंत्री यांनीही वारकऱ्यांना महत्त्वाचे आवाहन केले आहे. आळंदी आणि देहूकडे येण्यासाठी निघालेल्या वारकऱ्यांनी सध्याची पावसाची परिस्थिती लक्षात घेता आळंदी किंवा देहूत न येता पुण्यातूनच वारीत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अमृत स्टेशनची दिरंगाई, गाड्यांची कमतरता; मराठवाड्यातील खासदारांनी उपस्थित केले प्रश्न

## दोन वर्षांनंतर रेल्वे जीएमसोबत बैठक; मराठवाड्याच्या प्रश्नांवर खासदार आक्रमक



**नांदेड (प्रतिनिधी)–** तब्बल दोन वर्षांनंतर दक्षिण मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांसोबत मराठवाड्यातील खासदारांची बहुप्रतिक्षित बैठक सोमवार, दि. ६ जुलै रोजी दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागीय कार्यालयात पार पडली. या बैठकीत अमृत भारत स्टेशनच्या कामांतील दिरंगाई, नवीन गाड्यांची कमतरता आणि प्रशासनाच्या दुर्लक्षाचा मुद्दा खासदारांनी जोरदारपणे मांडला.

राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी अमृत स्टेशन, नांदेड- हडपसर एक्सप्रेसचा विस्तार, नवीन गाड्या, स्वच्छता आणि नांदेड जिल्ह्यातील स्थानके हैदराबादऐवजी नांदेडमध्येच ठेवण्याची आक्रमक मागणी केली. यावेळी खासदार रवींद्र चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, खासदार संजय जाधव यांनीही रेल्वे संदर्भात विविध प्रश्न उपस्थित करून समस्या मांडल्या.

दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक संजयकुमार श्रीवास्तव यांच्यासोबत मराठवाड्यातील खासदारांची बैठक गेल्या दोन वर्षांपासून रखडली होती. त्यामुळे रेल्वेचे अनेक प्रश्न प्रलंबित राहिले होते. १२ जून रोजी बैठक निश्चित झाली होती, मात्र विधान परिषदेच्या निवडणूक आचारसंहितेमुळे ती पुढे ढकलण्यात आली होती. अखेर ही बैठक दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक संजयकुमार श्रीवास्तव यांच्या उपस्थितीत सोमवारी नांदेडच्या विभागीय कार्यालयात घेण्यात आली.

बैठकीला राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण, राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे, राज्यसभा खासदार रामराव वडकुते, नांदेडचे खासदार रवींद्र चव्हाण, लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदीपान भुमरे, जालनाचे डॉ. कल्याण काळे, हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर, परभणीचे खासदार संजय जाधव, अकोल्याचे खासदार अनुप धोत्रे, खंडावाचे खासदार ज्ञानेश्वर पाटील आणि अमरावतीचे खासदार बळवंत वानखेडे यांची उपस्थिती होती.

बैठकीत उन्हाळ्यात व सण-उत्सवाच्या काळात पुणे, नागपूर, मुंबई, कोल्हापूरसाठी पुरेशा विशेष गाड्या सोडाव्यात. 'ट्रेन्स ऑन डिमांड' ही संकल्पना प्रत्यक्षात राबवावी. कोविडपूर्वी सुरू असलेल्या नांदेड- छत्रपती संभाजीनगर आणि नांदेड- दौंड गाड्या पूर्ववत कराव्यात. नांदेड- हडपसर एक्सप्रेसचा विस्तार मिरज किंवा पनवेलपर्यंत करावा. पाटणा- पूर्णा एक्सप्रेस जालनापर्यंत वाढवावी. नांदेड- पुणे आणि छत्रपती संभाजीनगर- हैदराबाद वंदे भारत व अमृत भारत गाड्यांचे प्रस्ताव मंजूर करावेत. अमृत भारत योजनेंतर्गत छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, पूर्णा आदी सात स्थानकांच्या विकासकामांना गती द्यावी. रेल्वे स्थानके आणि शौचालयांची स्वच्छता ठेवावी. एसी कोचमध्ये सुविधा वाढवाव्यात. नांदेड जिल्ह्यातील उमरी, धर्माबाद आणि उदगीर हे दक्षिण मध्य रेल्वे विभागाला जोडल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. किमान नांदेड जिल्ह्यातील भाग नांदेड विभागातच ठेवावा, अशी मागणी खा. चव्हाण यांनी केली.

हिंगोलीला जोडणाऱ्या गाड्यांचा प्रश्न खा. आष्टीकर यांनी मांडला. तसेच जालना ड्राय पोर्टची सद्यस्थिती आणि मालवाहतुकीतून महसूल वाढविण्याबतही चर्चा झाली.



**नांदेड–** ज्येष्ठ पत्रकार तथा लेखक मधुकर भावे यांनी माजी गृहराज्यमंत्री डॉ. माधवराव किन्हाळकर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा सत्कार करताना डॉ. माधवराव किन्हाळकर, जेष्ठ कवयित्री डॉ. वृषाली किन्हाळकर यांच्यासह माजी केंद्रीय राज्यमंत्री सूर्यकांताताई पाटील, खासदार प्रा. रवींद्र चव्हाण, दै. 'गोदातीर समाचार'चे संपादक केशव घोणसे पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे, काँग्रेस नेते अनिल मोरे, दीपनाथ पत्की, ज्येष्ठ पत्रकार विनायक एकबोटे, सुभाष किन्हाळकर, बालाजीराव इंगळे, महेश देशमुख आदी छायाचित्रात दिसत आहेत. यावेळी ज्येष्ठ पत्रकार संजीव कुळकर्णी, 'प्रजावाणी'चे संपादक शंतनू डोईफोडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष भगवानराव आलेगावकर, प्रा. शामल पत्की, माजी महापौर अजयसिंह बिसेन, माजी उपमहापौर आनंदराव चव्हाण, प्राचार्य पंजाबराव चव्हाण, शिवा अंबुलगेकर, शिवाजी गावंडे, विजय होकर्णे, अरुण कुलकर्णी, पंढरीनाथ बोकारे, संदीप देशमुख आदींची उपस्थिती होती.

# इंद्रायणीला पूर; आळंदीत न जाण्याचे प्रशासनाचे आवाहन

**पुणे (प्रतिनिधी)–** मुसळधार पावसामुळे इंद्रायणी नदीला पूर आला. त्यामुळे आळंदी शहरात जाणे सध्या सुरक्षित नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यानिमित्त आळंदीकडे निघालेल्या वारकरी आणि भाविकांसाठी राज्य सरकारने महत्त्वाचे आवाहन केले आहे.

प्रशासनाने वारकऱ्यांना आळंदीऐवजी पुणे शहरात होणाऱ्या वारीमध्ये सहभागी होण्याचा सल्ला दिला आहे. तसेच इंद्रायणी नदीपात्र, घाट परिसर आणि सुरक्षेच्या कारणास्तव बंद करण्यात आलेल्या पुलांकडे जाणे टाळावे, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

नागरिकांनी आणि वारकऱ्यांनी जिल्हा प्रशासन, पोलीस तसेच आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत माहितीलाच प्राधान्य द्यावे, असेही प्रशासनाने म्हटले आहे.

# अधिवेशनाला येणाऱ्या मंत्री, आमदारांनाही पावसाचा फटका; कामकाज स्थगित

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुंबईसह राज्यभरात सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा आणि पूरपरिस्थितीचा मोठा फटका सर्वसामान्यांप्रमाणेच मंत्री आणि आमदारांनाही बसला आहे. शनिवार आणि रविवारच्या सुट्ट्यांमुळे आपल्या मतदारसंघात गेलेले अनेक मंत्री आणि आमदार मुंबईत परतू न शकले नाही. रस्ते आणि रेल्वे मार्ग ठप्प झाल्याने, तसेच विमान सेवाही विलंबाने सुरू असल्याने अनेक लोकप्रतिनिधींना जागच्या जागीच अडकून पडावे लागले. त्यामुळे अनेकांनी मुंबईत येण्याऐवजी आपल्या मतदारसंघातच राहून मदतकार्याला प्राधान्य देणे पसंत केले. दरम्यान, मुंबईतील पावसाळी स्थिती लक्षात घेता विधानसभा आणि विधान परिषदेचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करावे लागले.

# 'वंदे भारत स्लिपर' मराठवाड्यातून चालवा -खा. अशोकराव चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड- पुणे एक्स्प्रेस हडपसरऐवजी पूर्ववत पुणे शहरातील मुख्य स्थानकापर्यंत चालवा तसेच नजीकच्या काळात सुरु होणारी मुंबई-हैद्राबाद 'वंदे भारत स्लिपर' रेल्वे मराठवाड्यातून चालवा, अशी मागणी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी केली.



दक्षिण मध्य रेल्वेने आयोजित केलेल्या नांदेड विभागातील खासदारांच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी त्यांनी मराठवाड्यातील पायाभूत सुविधांसह प्रवाशांची सुविधा व सुरक्षेबाबत अनेक मुद्द्यांवर जोरदार आवाज उठवला. ते म्हणाले की, नांदेड- पुणे एक्स्प्रेसला हडपसरऐवजी पुन्हा मुख्य पुणे स्थानकापर्यंत नेण्यात यावे, ही मराठवाड्यातील सर्व खासदारांची एकमुखी मागणी आहे. हडपसर रेल्वे स्थानक प्रवाशांसाठी अतिशय गैरसोयीचे आहे. ही गाडी भल्या पहाटे तिथे पोहोचते आणि तेथून पुणे शहरात इतरत्र जाणे प्रवाशांसाठी अतिशय त्रासाचे ठरत आहे. यामुळे प्रवाशांमध्ये मोठी नाराजी असून रेल्वे प्रशासनाने हा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी आग्रही भूमिका चव्हाण यांनी मांडली.

नजीकच्या काळात मुंबईहून चेन्नई, बंगळुरू आणि हैदराबादसाठी 'वंदे भारत स्लिपर' रेल्वेसेवा सुरु होणार आहेत. या तीनही गाड्या पुणे, सोलापूर, वाडी मार्गे जाणार आहेत. त्याऐवजी हैदराबादची गाडी मनमाड, छत्रपती संभाजीनगर, नांदेड मार्गे सुरु करावी, जेणेकरून महाराष्ट्रातील उत्तर महाराष्ट्र व मराठवाडा या दोन्ही विभागांना प्रीमियम रेल्वेसेवा मिळेल, असा महत्त्वपूर्ण प्रस्ताव त्यांनी मांडला. यासोबतच लातूर, दौंड मार्गे नांदेड-पुणे वंदे भारत एक्स्प्रेस ही **(पान ३ वर...)**

# नांदेड-मुंबई आणि टनकपूर-नांदेड नवीन एक्सप्रेसला हिरवी झेंडी

## खा.अशोकराव चव्हाण, खा. रवींद्र चव्हाण, खा. डॉ. गोपछडे आणि रेल्वेचे संजयकुमार श्रीवास्तव यांची उपस्थिती


**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेडच्या रेल्वे संपर्कात महत्त्वपूर्ण भर घालत नांदेड-लोकमान्य टिळक टर्मिनस (मुंबई) एक्सप्रेस तसेच टनकपूर- नांदेड एक्सप्रेस या दोन नवीन रेल्वेगाड्यांचा शुभारंभ सोमवार, दि.६ जुलै रोजी मान्यवरांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला.

नांदेड येथून हुजूर साहिब- लोकमान्य टिळक टर्मिनस एक्सप्रेसला तर टनकपूर येथून टनकपूर- हुजूर साहिब नांदेड एक्सप्रेसला एकाच वेळी हिरवी झेंडी दाखवून या नव्या सेवांचा प्रारंभ करण्यात आला.



या ऐतिहासिक सोहळ्यामुळे मराठवाडा, विदर्भ, मुंबई तसेच उत्तर भारतातील उत्तराखंड परिसराशी रेल्वे संपर्क अधिक सक्षम होणार असून प्रवासी, भाविक, विद्यार्थी, व्यावसायिक आणि पर्यटकांना मोठा लाभ मिळणार आहे. विशेषतः शिख धर्मीयांचे पवित्र तीर्थक्षेत्र असलेल्या सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वाराला देशभरातून येणाऱ्या भाविकांसाठी ही रेल्वे सेवा अधिक सोयीची ठरणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

आठवड्यातून दोन वेळेस धावणारी नांदेड- मुंबई एक्सप्रेसला हुजूर साहिब रेल्वे स्थानकावर खासदार अशोकराव चव्हाण, खासदार रवींद्र चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, महापौर कविता मुळे, दक्षिण मध्य रेल्वेचे महाप्रबंधक संजयकुमार श्रीवास्तव, नांदेड दक्षिण मध्य रेल्वेचे व्यवस्थापक प्रदीप कामले यांच्यासह आमदार अमरनाथ राजूरकर यांची उपस्थिती होती.



# नीट पेपरफुटीविरोधात आंदोलन; केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** देशभरात गाजत असलेल्या नीट व टीईटी पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ विद्यार्थी व संविधान बचाव कृती समितीच्या वतीने सोमवारी सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षणप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत केंद्र व राज्य शासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत पेपरफुटीचा तीव्र निषेध व्यक्त केला.

दिल्लीतील जंतर- मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा म्हणून सकाळी ११ ते सायंकाळी ४ या वेळेत हे धरणे आंदोलन पार पडले. आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत केंद्र व राज्य शासनाला विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.



निवेदनात नीट पेपरफुटीची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, तसेच टीईटी पेपरफुटीची जबाबदारी स्वीकारून राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनीही आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली.

नीट परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या विषयतज्ज्ञांची नियुक्ती देशभरातील विविध राज्यांतून होणे अपेक्षित असताना फिजिक्स, केमिस्ट्री आणि बायोलॉजी या तिन्ही विषयांचे तज्ज्ञ पुणे शहरातूनच नियुक्त करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला. त्यामुळे नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) मधील संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

देशातील परीक्षा प्रणाली अधिक पारदर्शक, विश्वासार्ह व विद्यार्थीहिताची करण्यासाठी व्यापक सुधारणा करण्यात याव्यात, टीईटी परीक्षा वर्षातून दोन वेळा एमपीएससीमार्फत घेण्यात यावी, टीएआयटी परीक्षा ऑनलाइनऐवजी ऑफलाइन पद्धतीने एमपीएससीमार्फत आयोजित करावी, तसेच ऑनलाइन परीक्षांमधील 'नॉर्मलायझेशन' प्रक्रियेमुळे गुणांमध्ये होणाऱ्या बदलांबाबत विद्यार्थ्यांमध्ये असलेला संभ्रम दूर करण्यासाठी एमपीएससीच्या सर्व परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेण्यात याव्यात, अशी मागणीही करण्यात आली.

या आंदोलनात प्रा. गौतम दुथडे, श्याम निलंगेकर, भाऊराव भदरगे, प्राचार्य डॉ. रामराव गंगासागरे, संजय वाघमारे, के. एच. वने, डॉ. अनंत राऊत, उत्तम वाढवे, प्रा. प्रबुद्ध चित्ते, उत्तम सावळे, भीमराव हाटकर, ए. टी. सूर्यवंशी, सुभाष लोखंडे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक व शिक्षणप्रेमी नागरिक उपस्थित होते.

# अतिक्रमण व अवैध पार्किंगविरोधात धडक मोहीम; ६४ केसेस, ५४ हजारांचा दंड



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली शहर वाहतूक शाखेकडून अतिक्रमण व अवैध पार्किंगविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. यामध्ये जवळपास ६४ केसेस दाखल करून ५४ हजारांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

शहरातील प्रमुख रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना होणारे अतिक्रमण आणि बेकायदेशीरपणे पार्किंग केलेल्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी होत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी होत्या. यामुळे सर्वसामान्यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता.

दि. ६ जुलै रोजी वजिराबाद शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक मारोती मुंडे यांच्या नेतृत्वाखाली रेल्वे स्टेशन ते छत्रपती शिवाजी महाराज चौक, वजिराबाद चौक, तिरंगा चौक ते गोवर्धन घाट ब्रिज या मुख्य मार्गावर विशेष कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान रस्त्यावरील अतिक्रमणे हटविण्यात आली. हातगाड्या, फळ विक्रेते, टपऱ्या आणि इतर अडथळे दूर करण्यात आले.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# रुग्ण प्रथम, नफा नंतर

आरोग्य सेवा ही कोणत्याही समाजातील सर्वांत महत्त्वाची आणि संवेदनशील सेवा मानली जाते. डॉक्टरांना समाजात देवदूताचे स्थान दिले जाते, कारण ते जीव वाचविण्याचे कार्य करतात. परंतु गेल्या काही वर्षांत वैद्यकीय व्यवसायातील व्यापारीकरणामुळे अनेक खाजगी रुग्णालये आणि काही डॉक्टरांच्या मनमानी कारभाराबद्दल गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. अवाजवी शुल्क, अनावश्यक चाचण्या, रुग्णांच्या नातेवाईकांवर आर्थिक दबाव आणि आपत्कालीन परिस्थितीत पैशांअभावी उपचार नाकारल्याच्या घटनांनी आरोग्य व्यवस्थेवरील विश्वासाला तडा गेला आहे. अशा पार्श्वभूमीवर राज्य सरकारने प्रस्तावित केलेला महाराष्ट्र चिकित्सा आस्थापना कायदा हा अत्यंत आवश्यक आणि स्वागतार्ह निर्णय म्हणावा लागेल. या कायद्यामुळे कोणतेही रुग्णालय किंवा दवाखाना नोंदणीशिवाय सुरू करता येणार नाही. त्याचबरोबर आपत्कालीन परिस्थितीत आलेल्या रुग्णाला पैशांची मागणी न करता प्रथमोपचार देणे बंधनकारक करण्यात आले आहे. जीव वाचविणे हे कोणत्याही वैद्यकीय व्यवसायाचे पहिले कर्तव्य असते. त्यामुळे आर्थिक व्यवहारांपेक्षा मानवी जीवनाला प्राधान्य देणारी ही तरतूद अत्यंत महत्त्वाची आहे. आजवर अनेक वेळा अपघातग्रस्त किंवा गंभीर रुग्णांना पैसे भरल्याशिवाय उपचार नाकारल्याच्या घटना समोर आल्या आहेत. अशा अमानुष प्रकारांना या कायद्यामुळे निश्चितच आळा बसेल. या कायद्याचे आणखी एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक रुग्णालयाला उपचार, तपासण्या आणि इतर सेवांचे दरपत्रक मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत दर्शनी भागात तसेच संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे बंधनकारक करण्यात आले आहे. अनेक रुग्णालयांमध्ये उपचार सुरू झाल्यानंतरच प्रचंड मोठी बिले समोर येतात. रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांकडे दुसरा पर्याय नसल्याने त्यांना ती भरावी लागतात. अनेक वेळा अशा पैशाची तरतूद करेपर्यंत रुग्णाची अवस्था गंभीर झालेली असते. म्हणूनच दरपत्रक सार्वजनिक झाल्यास रुग्णांना माहितीपूर्वक निर्णय घेता येईल आणि आर्थिक शोषणालाही आळा बसेल. विशेष म्हणजे हा कायदा केवळ ॲलोपॅथीपुरता मर्यादित नसून आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी, सिद्ध, योग आणि निसर्गोपचार अशा सर्व वैद्यकीय पद्धतींतील खाजगी, धर्मादाय आणि स्वायत्त संस्थांनाही लागू होणार आहे. त्यामुळे संपूर्ण आरोग्य व्यवस्थेसाठी एकसमान जबाबदारी आणि उत्तरदायित्व निश्चित होईल. राज्य चिकित्सा आस्थापना परिषदेच्या स्थापनेमुळे या संस्थांवर प्रभावी नियंत्रण ठेवता येईल आणि नियमांची अंमलबजावणी अधिक काटेकोरपणे होण्याची अपेक्षा आहे. काही डॉक्टर संघटना या कायद्याला विरोध करतील. त्यांच्या सवयीप्रमाणे, अतिरिक्त शासकीय हस्तक्षेपाचा मुद्दा उपस्थित करतील, अशी शक्यता नाकारता येत नाही. कारण ह्या नवीन कायद्यामुळे डॉक्टरांच्या मनमानी कारभारावर अंकुश येणार आहे. मात्र हा कायदा डॉक्टरांविरोधात नसून रुग्णांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी आहे, हे त्यांनी लक्षात घेतले पाहिजे. प्रामाणिकपणे सेवा देणाऱ्या डॉक्टरांना या कायद्याची भीती बाळगण्याचे कारण नाही. उलट काही मोजक्या व्यावसायिक प्रवृत्तीच्या डॉक्टरांमुळे संपूर्ण वैद्यकीय क्षेत्राची प्रतिमा मलीन होत आहे. त्यामुळे अशा मनमानी कारभारावर अंकुश ठेवणे ही काळाची गरज बनली होती. आरोग्य सेवा ही केवळ व्यवसाय नसून सामाजिक जबाबदारी आहे. उपचाराच्या नावाखाली रुग्णांची आर्थिक पिळवणूक करणाऱ्या आणि नफ्याला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या प्रवृत्तींना कायद्याचा धाक आवश्यक आहे. शासनाने घेतलेला हा निर्णय रुग्णांच्या हिताचा, पारदर्शकतेला चालना देणारा आणि आरोग्य व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास पुनर्स्थापित करणारा आहे. आता गरज आहे ती या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची. केवळ कायदा करून थांबून चालणार नाही; नियमित तपासणी, तक्रार निवारणाची सक्षम यंत्रणा आणि दोषी रुग्णालयांवर कठोर कारवाई यांचीही तितकीच आवश्यकता आहे. रुग्णांचे हक्क कागदावर न राहता प्रत्यक्षात मिळाले, तरच या कायद्याचे खरे यश ठरेल.

# भक्ती श्रद्धा आणि समतेचे प्रतीक-पंढरीची वारी



विठुरायाचे दर्शन घेण्यासाठी लाखो भाविक भक्त पंढरीला जाण्यासाठी तयारीला लागले आहेत.श्रीक्षेत्र आळंदी येथून संत ज्ञानेश्वर माऊलीची व श्रीक्षेत्र देहू येथून संत जगद्गुरु तुकाराम महाराजांची दिंडी पंढरपूरकडे सात जुलै रोजी प्रस्थान करणार आहेत. सगळीकडे

विठूनामाचा जयघोष होणार आहे. कधी एकदाचे विठ्ठलाला डोळे भरून पाहावे. असे महाराष्ट्र, कर्नाटक मधील घराघरातून प्रत्येक भक्ताला वाटत आहे.असा हा नयनरम्य सोहळा पंढरीत आषाढी एकादशीला भरणार आहे. या दिंडी सोहळ्यामध्ये भाव,भक्ती,श्रद्धा आणि समानता असणारी ही दिंडी आपणाला दिसणार आहे. या दिंडीमध्ये कोणी लहान मोठा नाही, सर्वजण आपापल्या परीने सर्व काही विसरून पंढरीच्या वाटेने जाणार आहेत. ज्ञानोबा -तुकोबाचा जयघोष होणार आहे. भक्ताच्या हातात टाळ ,वीणा असणार आहे. माझे माहेर पंढरी म्हणून पाणी, पाऊस ,वारा, वादळ यांचा तमा न करता फक्त आणि फक्त पांडुरंगाला भेटण्यासाठी चालत आहेत. प्रत्येक भक्त वयाचा विचार न करता आबाल वृद्ध या दिंडीमध्ये सामील होतात. ही दिंडी व्यक्तीला मानवतावाद शिकवते. ह्या दिंडी मधून प्रत्येक समाजाचा माणूस चालतो.

तो आपली जात विसरतो. *यारे यारे लहान थोर* म्हणून प्रत्येकाच्या चरणाला स्पर्श करतो. सातशे ते आठशे वर्षापासून आळंदी आणि देहू वरून जाणारी पंढरपूरला दिंडी ही समतेची दिंडी म्हणून ओळखली जाते. तेथे कसलाही भेदभाव नाही. येथे मोठेपणा, श्रीमंती, दारिद्र्य, गरीबी काही नाही. फक्त मानवतावाद आहे. *विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ* या ठिकाणी तुम्ही भेदाभेद केला तर अमंगल झालात, कसलाही भेद करू नका. सर्व एका झेंड्या खाली चला.ही पायी वारी चैतन्याची, आनंदाची, हर्षाची करावयाची आहे. जीवन हे एक संघर्ष आहे.या संघर्षा तून आपण जात असतो. परंतु पंढरीच्या वारीला जाऊन त्याम धून थोडा विसावा घेऊन पांडुरंगाचे दोन शब्द मुखातून गाऊन आनंद साजरा करतो.

ग्रामीण भागातून शेतकरी कामातून थकलेला असतो. या थकलेल्या जीवाला थोडी विश्रांती मिळावी, म्हणून हरिनामाचा गजर करत वारीला निघतो. *होय होय पंढरी।मी पंढरीचा वारकरी* पंढरीची वारी ,आहे माझ्या घरी म्हणून तो परमेश्वराला आपले गा-हाणे सांगण्यासाठी जातो.

पंढरपूर हा भूलोकावरील स्वर्ग आहे.

या पंढरी नगरीत पांडुरंगाचं अढळ स्थान आहे.म्हणून देशाच्या सर्व बाजूंनी, दिशांनी पंढरीच्या वारीला भक्त धावून येतात. या वारीमध्ये कधीही कोणीही उपाशी राहत नाही. एवढ्या वारी मध्ये आलेल्या लोकांना पांडुरंग सामावून घेतो. त्याची लीला अपरंपार आहे.. भक्त पुंडलिकासाठी तो युगानुयुगे उभा आहे.

आपल्या कमरेवर हात ठेवून जगावर लक्ष देतो. तो कधी निवांत बसला नाही. त्यांच्या हातात कोणतेही शस्त्र नाही. तो आक्रमक नाही. शांत सोज्वळ मनाने सर्वावर तो कृपा करीत उभा आहे. दोन्ही पाय समान आहेत सर्वांना तो समानतेने वागवतो . म्हणून त्यांना वारकरी आपले दैवत म्हणतात. असा हा पंढरीचा पांडुरंग सगळ्यांचा सखा आहे.

संत नामदेवाचे त्यांनी नैवेद्य भक्षिले. संत चोखामेळ्यांचे गुरे राखले,संत सावता माळ्यांना मळ्यात जाऊन भेटले. संत जनाबाईला जाते ओढू लागले. संत कबीराचे शेले विणले.

संत गोरा कुंभाराबरोबर माती तुडवली. अशी कामे त्यांनी केली.पंढरीचा वारकरी हा पांढरा शुभ्र वस्त्र परिधान करतो. गोपीचंदनाचा टिळा भाळी लावतो. डोक्यावर टोपी घालून हातात टाळ घेऊन पंढरीचा महिमा गातो. त्याला आस पंढरीला जाण्याची आणि विठ्ठलाला पाहण्याची लागलेली आहे. म्हणून ही आषाढी वारी जगात गाजलेली आहे. ती समता दर्शवते

.चंद्रभागेच्या वाळवंटामध्ये सर्वजण स्नान करतात. कसलाही भेदभाव नाही. म्हणून पंढरीच्या वारीमध्ये सहभागी होण्यासाठी कोणालाही निमंत्रण नाही.पत्रिका नाही, फोन नाही. तरीही लाखो भाविक भक्त आपल्या घरून दिंडीमध्ये सामील होतात. मनोभावे प्रत्येक म ुक्कामी नामस्मरण करून पुढे मार्गस्थ होतात. ज्ञानोबा- तुकारामाच्या जयघोषा मध्ये दोन्ही दिंड्या मार्गक्रमण करीत असतात. वाखरी या ठिकाणी शेवटचे रिंगण होते. भक्तांचा उत्साह शिगेला पोहोचतो

.भक्तगण, महिला ,पुरुष, प्रशासकीय अधिकारी अतिशय आनंदात या रिंगणाचा आनंद घेतात. वारकरी व प्रशासकीय अधिकारी फुगड्या खेळतात. हा आनंदोत्सव इतरत्र कोठेही पाहायला मिळत नाही. तो फक्त पंढरीच्या वारीमध्येच दिसून येतो.आळंदी पंढरपूर जाणाऱ्या मार्गावरच्या गावकरीं रांगोळ्या काढून भगव्या कमानी उभारून आलेल्या भक्तगणांना नमन करून त्यांची राहण्याची सोय करतात. पिण्याचे पाणी आरोग्य, नाष्टा, भोजन सर्व देऊन भक्ताच्या मनाला आनंदीत करतात. तोच भक्त पंढरपूरच्या दिशेने निघतो. त्याच्या चेहऱ्यावर आपण परमेश्वराला भेटण्यासाठी चालत आहोत.

याचा आनंद ओसंडून वाहत असतो. या वारीमध्ये सुद्धा काही हौशे,गवशे, नवशे असतात. दरवर्षी माऊलीचा रथ ओढण्यासाठी वेगवेगळ्या गावच्या शेतकऱ्यांना त्यांच्या बैलांना घेऊन निमंत्रित केले जाते. असा हा जनसमुदाय दररोज एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी परमेश्वराचे भजन गात एक एक पाऊल पंढरीकडे जातात आणि पंढरीचा महिमा गातात. *अवघे गरजे पंढरपुर। चालला नामाचा गजर।।* पाठीमागे कोरोनाच्या काळात सुद्धा ह्या दिंड्या थांबलेल्या नाहीत. निवडक भक्त मंडळी घेऊन या दिंडया चालू राहिल्या. संत निवृत्तीनाथ, संत सोपान देव, संत मुक्ताबाई ,संत ज्ञानेश्वर माऊली या सर्वांच्या भेटी या पायी दिंडीच्या निमित्ताने पंढरपुरात होतात.विठ्ठल म ाझा माझा । मी विठ्ठलाचा।। असे गुणगुणक सर्व वारकरी फक्त मंडळी आषाढी एकादशीला पंढरपुरात विराजमान होतात.पंढरीच्या वारीला पायी जाणाऱ्या सर्व भाविक भक्तांना विठू माऊली प्रतिष्ठान गोकुळवाडी ता. मुखेड जि. नांदेड यांच्या वतीने खूप खूप शुभेच्छा.

**-प्रा. विठ्ठल बरसमवाड**
गोकुळवाडी, ता. मुखेड

# रिकाम्या हाताने आलेला माणूस रिकाम्या हातानेच जातो



'अति तिथं माती' ही म्हण जगातल्या प्रत्येक माणसाला माहीत आहे. कोणतीही बाब योग्य प्रमाणातच असली पाहिजे. अगदी अत्यंत चांगल्या गोष्टीने सुद्धा प्रमाण ओलांडले तर ती गोष्ट चांगली राहत नाही. आणि एखादी वाईट वाटणारी गोष्ट सुद्धा प्रमाणात असेल तर ती वाईट ठरत नाही. म्हणूनच जगात अशा अनेक बाबी आहेत ज्यांना विष मानले आहे तरीसुद्धा त्या जीवनात प्रमाणामध्ये असाव्या लागतात. उदाहरणच द्यायचे झाले तर नित्याच्या जेवणामध्ये असणाऱ्या मिठाला आणि साखरेला संशोधना नुसार विषच मानावे लागेल. पण तरीसुद्धा यांचे जेवणात आणि जी-वनात किती महत्त्वाचे स्थान आहे हे आपण सर्वजण जाणतोच. मिठाशिवाय जेवणाला चवच नाही. या उलट अनेक वस्तू अमृतासारख्या आहेत. तरीसुद्धा त्या प्रमाणाबाहेर सेवन केल्या तर त्या विषच ठरतात. ही गोष्ट केवळ खाण्याच्या बाबी संदर्भातच नाही. तर ती जीवनातील प्रत्येक बाबीला लागू पडते. म्हणून आम्ही नेहमी ऐकत आलोय 'प्रम ाणामध्ये सर्व काही असावे...'

मुळात ज्या गोष्टी वाईट आहेत त्या अजिबातच नसाव्यात. पण चांगल्या गोष्टींचा सुद्धा अतिरेक होऊ नये. उदाहरणच द्यायचे झाले तर...इतरांना मदत करणे, वेळ-ोवेळी सहकार्य करणे ही चांगली बाब आहे. पण ती सुद्धा योग्य मर्यादित असली पाहिजे. स्वतःच्या आणि स्वतःच्या कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठी सक्षम नसणाऱ्या माणसांनी सतत परोपकाराच्या नावाखाली...आणि माणुसकीच्या लेबलाखाली सतत काही व्यक्तींना म ोठ्या प्रमाणात आणि आवाक्याबाहेर केलेली मदत कायमस्वरूपी प्रश्नच निर्माण करते. सतत स्वतःच्या आणि स्वतःच्या कुटुंबाच्या गरजा भागवण्यापेक्षा...स्वतःचे आणि कुटुंबाचे भविष्य सुरक्षित करण्यापेक्षा...तुम्ही जर काही विशिष्ट माणसांना आवाक्याबाहेरची मदत करत असाल तर हे व्यावहारिक जग तुम्ही कोणीही असाल तरीसुद्धा तुम्हाला नक्की प्रश्न विचारेल. असे का...? आणि असे करण्यामागचा नेमका हेतू काय...? हे सर्वांनाच ज्ञात आहे. तरीसुद्धा माणसे आयुष्यभर प्रमाण सांभाळत नाहीत. अक्षरशः वाहवत जातात. परोपकार आणि चांगुलपणा याचा अतिरेक करतात...

तार्किक विचार केला तर तुम्ही जर एखाद्या व्यक्तीशी अति प्रमाणात चांगले....अतीव सहकार्याचे...वागत असाल तर बघणाऱ्यांना याच्याही पुढे जाऊन प्रत्यक्ष ज्या व्यक्तीशी चांगले वागत आहात अगदी त्यालासुद्धा नक्कीच प्रश्न पडतो. असे का...? मुळात तुम्ही कितीही चांगले असलात. तरी तुमचा चांगले-वाईटपणा हा तुमच्या मनाच्या निरागसतेवरून ठरत नाही तो ठरतो तुमच्या वागण्यावरून. म्हणून किमान स्वतःसाठी नाही तर जगासाठी तरी प्रमाण सोडायचे नसते. कधीकधी चांगल्या गोष्टी सुद्धा प्रमाणा-पेक्षा जास्त झाल्या तर त्याचेही व्यसन लागते आणि त्याची सुद्धा नशा यायला लागते. बरीच माणसे परोपकार आणि चांगुलपणाच्या नशेत जगतात...संपूर्ण आयुष्य या नशेमध्ये वाहवत जातात... हे सगळे करताना आपल्या अत्यंत जवळच्या माणसांना दुखावतात... कळत-नकळत त्यांच्यापासून दूर जायला लागतात. एक दिवस बऱ्याच मोठ्या वाईट अनुभवानंतर चांगुलपणाची नशा उतरते. आणि त्यावेळी मात्र काहीच शिल्लक उरलेले नसते.

आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या गरजा पूर्ण झाल्यानंतर जमेल तेवढी गरजूंना मदत ही सर्वसामान्य पद्धत आहे. मुळात आपले आणि आपल्या कुटुंबाचे हित साधण्यापूर्वीच इतरांना आवाक्याबाहेर असणारी मदत करणे सुद्धा एका दृष्टीने आपल्या कुटुंबावर झालेला अन्याय असतो. याच्याही पुढचा विचार म्हणजे प्रत्येकाने आपल्या आयुष्यात आपल्याला जमेल तेवढे कष्ट...जमेल तेवढे कार्य... आणि जमेल तेवढेच कर्तृत्त्व करण्याचा प्रयत्न करावा. काम करण्याचा... कष्ट करण्याचा...आणि पैसा कमावण्याचा सुद्धा अतिरेक होता कामा नये. अर्थार्जनाचे सुद्धा व्यसन लागता कामा नये. आपले आणि आपल्या कुटुंबाचे जीवन घडवताना अती धावपळ करणे सुद्धा व्यर्थ आहे. मुळात क्षणभंगुर असणाऱ्या जीवनासाठी अफाट धावपळ करून बिनभरवश्याची गुंतवणूक कशासाठी...? मुळात जीवन तुम्हाला गुंतवणूक मागत नाही. या जीवनाला खऱ्या अर्थाने सोडवणुकीचे गरज असते. गोष्टी समजून साध्या, सोप्या, सरळ करता आल्या पाहिजेत. अत्यंत साधेपणाने आणि मोकळ्या वाता-वरणात जगता आले पाहिजे. शेवटी रिकाम्या हाताने आलेला माणूस रिकाम्या हातानेच परत जातो. मग आयुष्यभराची ही सगळी ओढाताण कशासाठी...? याचा अर्थ असा नाही की माणसाने कष्ट करू नयेत.... काम करू नये.... प्रयत्न करू नयेत...याउलट माणसाने सतत क्रियाशील रहावे. यात शंकाच नाही पण कुठलीही धावपळ आणि कष्ट आपल्या जिवापेक्षा आणि जीवनापेक्षा महत्त्वाचे नाहीत. कोणतेच काम आपल्या जिवापेक्षा मोठे नाही. तुम्ही कितीही उदात्त, समाजहिताचे आणि विश्वकल्याणाचे काम करत असलात तरीसुद्धा ते काम करण्यासाठी तुमचे आरोग्य चांगले राहणे गरजेचे आहे. म्हणून प्रमाणापेक्षा जास्त धावपळ केल्याने आजारी पडाल आणि करत असलेले ध्येयवेडे उदात्त कार्य थांबेल. म्हणून कार्य चालू राहण्यासाठी तरी प्रमाणात धावपळ करा. त्यामुळे थोडक्यात काय तर अति सर्वत्र वर्जयेत म्हणतात ते या अर्थाने....


**-मयूर मधुकरराव जोशी**
'विठ्ठल-रुक्मिणी'
नगर, जिंतूर
मो. ७९७२३४४१२८

# अभिनयातील सम्राट दिलीपकुमार

ट्रॅजीडी किंग म्हणून ओळखले जाणारे हिंदी चित्रपट सृष्टीतील भीष्माचार्य दिलीपकुमार यांचा आज दुसरा स्मृतिदिन. दोन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ७ जुलै २०२१ रोजी दिलीपकुमार यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ९८ व्या वर्षी निधन झाले. दिलीपकुमार यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीतच नव्हे तर संपूर्ण देशात शोककळा पसरली होती. दिलीपकुमार यांच्या निधनाने अभिनयाचे चालते बोलते विद्यापीठच हरपले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

दिलीप-कुमार यांचा जन्म ११ डिसेंबर १९२२ रोजी पेशावर येथे झाला. त्यांचे मूळ नाव मोहम्मद युसूफ खान असे होते. पेशावरहून त्यांचे कुटुंब उदरनिर्वाहासाठी मुंबईत आले. दिलीपकुमार यांच्यासह बारा भावंडे होती. त्यांच्या कुटुंबात पाहुण्यांचाही राबता होता. त्यामुळे आपणही काही तरी काम करून घर खर्चास मदत करावी असा विचार करून दिलीपकुमार पुण्याला आले. तिथे त्यांनी लष्करी कँटीनमध्ये मॅनेजरचा सहाय्यक म्हणून काम केले. दुसऱ्या महायुद्धात लष्करी कँटीनचे व्यवस्थापन बदलले आणि दिलीपकुमार जमा केलेले पाच हजार रुपये घेऊन घरी परत आले.

मुंबईला आल्यावर त्यांना पुन्हा नोकरी शोधावी लागली. दिलीपकुमार हे नोकरीच्या शोधात आहे



हे त्यांचे परिचित डॉ. मसानी यांना समजले. तेंव्हा डॉ. मसानी यांनी त्यांना माहीम येथील बॉम्बे टॉकीजच्या स्टुडिओमध्ये देविका राणी यांच्याकडे घेऊन गेले. देविका राणी यांनी दिलीपकुमार यांचे राजबिंडे व्यक्तिमत्त्व आणि उर्दूवरील पकड पाहून त्यांना महिना बाराशे रुपये पगारावर अभिनय करण्याची ऑफर दिली. वास्तविक हा प्रस्ताव दिलीपकुमार यांना मान्य नव्हता, कारण चित्रपटात अभिनय करावा असा विचार त्यांनी कधीही केला नव्हता, पण महिना बाराशे रुपये मिळतात ही रक्कम त्याकाळी खूप मोठी होती. त्यामुळे त्यांनी हा प्रस्ताव स्वीकारला आणि देशाला एक महान अभिनय सम्राट मिळाला. देविका राणी यांनीच त्यांना दिलीपकुमार हे नाव दिले.

१९४४ साली आलेल्या ज्वार भाटा या चित्रपटाद्वारे दिलीपकुमार यांनी आपल्या चित्रपट कारकिर्दीला सुरवात केली. १९४४ ते १९९८ पर्यंत म्हणजे सहा दशकापेक्षा अधिक काळ दिलीपकुमार यांनी आपल्या अभिनयाने गाजवून सोडला. या दरम्यान त्यांचे अनेक चित्रपट सुपरहिट झाले. यात त्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका केल्या. अंदाज, राम और श्याम, आन, देवदास, आझाद, मुगल-ए-आझम, गंगा जमुना, नया दौर हे त्यांचे चित्रपट तर सुपरहिट झाले. या चित्रपटांनी तरुणाईला वेड लावले. १९५७ साली आलेल्या गंगा जमुना या चित्रपटातील मांग के साथ तुम्हारा...मैने मांग लिया संसार...या गाण्याने तरुणाईला वेड लावले होते. या चित्रपटात वैजयंती माला या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट रसिक त्यांच्या अभिनयाने इतके भारावले होते की त्याकाळच्या तरुणांचे ते आयडॉल बनले. देवदास या चित्रपटातील त्यांची भूमिका ही तर त्यांच्या कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरली. त्यांच्या या चित्रपटातील भूमिकेचे नंतर अनेक अभिनेत्यांनी अनुकरण केले, पण कोणालाही त्यांच्या अभिनयाच्या जवळपास पोहचता आले नाही.

१९७६ साली आलेला बैराग हा चित्रपट त्यांचा नायक म्हणून शेवटचा चित्रपट ठरला. या चित्रपटात त्यांनी तिहेरी भूमिका साकारली. त्यानंतर काहीकाळ ब्रेक घेऊन त्यांनी मनोजकुमार यांच्या क्रांती या चित्रपटापासून चरित्र अभिनेता म्हणून काम करण्यास सुरुवात केली. शक्ती, विधाता, मजदूर, दुनिया, मशाल, कर्मा या चित्रपटात त्यांनी चरित्र भूमिका केल्या. सुभाष घई यांच्या सौदागर या चित्रपटात राजकुमार यांच्यासोबत त्यांची जुगलबंदी चांगलीच गाजली. १९९८ साली आलेला किला हा त्यांनी अभिनय केलेला शेवटचा चित्रपट ठरला. या दरम्यान त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. सर्वोत्कृष्ट अभिनयासाठी दिलीपकुमार यांना आठ पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांच्या अभिनय कारकिर्दीची योग्य दखल घेऊन पद्मभूषण, पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने त्यांना गौरवले. हिंदी चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च अशा दादासाहेब फाळके पुरस्कारानेही त्यांना गौरविण्यात आले. पाकिस्ताननेही त्यांना निशान-ए - इम्तियाज या त्यांच्या सर्वोच्च पुरस्काराने गौरवले आहे. दिलीपकुमार हे अभिनयातील भीष्माचार्यच होते. त्यांच्यासारखा अभिनेता पुन्हा होणार नाही. अभिनय सम्राट दिलीपकुमार यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**-श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# नांदेड येथे 'आयसीएआय एमएसएमई महोत्सव' संपन्न; 'विकसित भारत' संकल्पनेवर मार्गदर्शन




**नांदेड (प्रतिनिधी)**–दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या 'MSME Startup Committee' अंतर्गत आणि 'ICI नांदेड शाखा' (WIRC d WICS) यांच्या संयुक्त विद्यमाने ३० जून २०२६ रोजी नांदेड येथील नियोजन भवन येथे 'आयसीएआय एमएसएमई महोत्सव – २०२६' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

Empowering MSMEs, Building Viksit Bharat या मुख्य संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमाला उद्योजक, व्यावसायिक आणि सीए विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. प्रमुख उपस्थिती आणि मार्गदर्शन, प्रमुख वक्ता म्हणून नागपूर येथील प्रख्यात सीए अतुल हुरकट यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी पर्यटन सबसिडी, मॅन्युफॅक्चरिंग सबसिडी आणि वेअरहाऊस व फूड युनिट्ससाठीच्या शासकीय सबसिडी व योजनांविषयी अत्यंत सविस्तर व तांत्रिक मार्गदर्शन केले.

याप्रसंगी सन्माननीय अतिथी म्हणून चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे अध्यक्ष डी. पी. सावंत, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल इंगळे, उद्योगपती सीए दीपक मलिवाल आणि कॅट नांदेडचे अध्यक्ष मधुकर मामडे उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नांदेड शाखेचे अध्यक्ष सीए विजय कालानी आणि नांदेड विकासाचे अध्यक्ष सीए सागर शर्मा यांनी मुख्य धुरा सांभाळली. त्यांच्यासोबतच नांदेड विकासा (WICS) समितीचे विद्यार्थी सदस्य आणि सर्व पदाधिकाऱ्यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमामुळे नांदेड जिल्ह्यातील एमएसएमई क्षेत्रातील व्यावसायिक, सीए सभासद आणि सीए विद्यार्थ्यांना केंद्र व राज्य सरकारच्या विविध अनुदानांचा लाभ कसा घ्यावा, या विषयीचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

## अर्धापूर पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षकपदी महादेव मांजरमकर रुजू



**अर्धापूर (प्रतिनिधी)**– पोलीस ठाण्याचे ठाणेदार म्हणून पोलीस निरीक्षक महादेव मांजरमकर हे रुजू झाले आहेत.

अर्धापूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी म्हणून यापूर्वी पोलीस निरीक्षक महादेव मांजरमकर यांनी काम केले होते. अर्धापूर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकपदी महादेव मांजरमकर यांची नियुक्ती झाल्यामुळे शिवसेना ठाकरे गटाचे शहर प्रमुख काजी सलावोद्दीन, शेतकरी सेना तालुकाप्रमुख रमेश क्षीरसागर, उपतालुकाप्रमुख अशोक डांगे, सोशल मीडियाचे रफिक शेख यांच्यासह विविध क्षेत्रातील मंडळींनी त्यांचे स्वागत करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# मुदखेड तालुक्यात खरीप पेरणीला वेग; ८१ टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण

### तिन्ही महसूल मंडळांत पेरणीयोग्य पाऊस; पुढील आठवड्यात शंभर टक्के पेरणी पूर्ण होण्याची शक्यता

**मुदखेड (प्रतिनिधी)**– मुदखेड तालुक्यात मान्सूनने समाधानकारक हजेरी लावल्यामुळे खरीप हंगामातील पेरणीच्या कामांना मोठा वेग आला आहे. तालुक्यातील तिन्ही महसूल मंडळांमध्ये पेरणीयोग्य पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर पेरणी पूर्ण केली असून, आजअखेर तालुक्यात १५,८२६ हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. हे एकूण सरासरी खरीप क्षेत्र १९,५२० हेक्टरच्या तुलनेत ८१ टक्के इतके आहे.

तालुक्यात आजअखेर झालेली पेरणी पुढीलप्रमाणे आहे :

सोयाबीन : १४,१०४ हेक्टर, तूर : ७२३ हेक्टर, कापूस : ४२१ हेक्टर, मुग : ३०० हेक्टर, उडीद : २३८ हेक्टर, – खरीप ज्वारी : ४० हेक्टर, एकूण पेरणी : १५,८२६ हेक्टर (८१%).

पर्जन्यमानाबाबत बोलायचे झाल्यास, मुदखेड तालुक्याचे सरासरी वार्षिक पर्जन्यमान ८२९.२० मि.मी. असून, आजअखेर १९६.९० मि.मी. प्रत्यक्ष पावसाची नोंद झाली आहे.

महसूल मंडळनिहाय पर्जन्यमान पुढीलप्रमाणे आहे : मुदखेड मंडळ : २११ मि.मी., मुगट मंडळ : २२७ मि.मी., बारड मंडळ : १५१ मि.मी.

गेल्या आठवड्यापासून झालेल्या पावसामुळे जमिनीत आवश्यक वाफसा निर्माण झाल्याने पेरणीच्या कामांना गती मिळाली आहे. तिन्ही महसूल मंडळांमध्ये पेरणीसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली असून शेतकरी मोठ्या उत्साहाने पेरणी पूर्ण करत आहेत.

आणखी दोन दिवस वाफसा कायम राहिल्यास पुढील एक आठवड्याच्या कालावधीत तालुक्यातील खरीप पेरणी शंभर टक्के पूर्ण होईल, असा विश्वास डॉ. अमरज्योती गच्चे, तालुका कृषी अधिकारी, मुदखेड यांनी व्यक्त केला आहे. तसेच शेतकऱ्यांनी शिफारशीनुसार पिकांची पेरणी, बीजप्रक्रिया व संतुलित खत व्यवस्थापनाचा अवलंब करून खरीप हंगाम यशस्वी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

## शिष्यवृत्ती परीक्षेत निमगाव केंद्रातून कु. स्वप्नजा काकडे प्रथम

**अर्धापूर (प्रतिनिधी)**– तालुक्यातील जि. प. प्रा. शाळा रोडगी येथील कु. स्वप्नजा संतोष काकडे या विद्यार्थिनीने शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.



शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता ५ वीत असलेली कु. स्वप्नजा संतोष काकडे या विद्यार्थिनीने निमगाव केंद्रात प्रथम येण्याचा मान मिळवल्याबद्दल सरपंच सौ. सरिताताई दगडू काकडे, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष संतोष काकडे, दगडू काकडे, राजू सीतापराव, भाजयुमोचे विठ्ठल पाटील काकडे,संतोष कदम,शेतीनिष्ठ शेतकरी प्रकाश सितापराव,राजाराम राठोड,शिक्षक सचिन काळे यांच्यासह अनेकांनी तिचे अभिनंदन केले.

# मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमांतर्गत तहसीलदारांची मतदारांच्या घरी प्रत्यक्ष भेट; नागरिकांना सहकार्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यभर राबविण्यात येत असलेल्या मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत ०८७ नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत आणि त्रुटीमुक्त करण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेद्वारे प्रत्येक पात्र नागरिकाची नोंद सुनिश्चित करणे, मृत अथवा स्थलांतरित मतदारांची माहिती अद्ययावत करणे तसेच मतदारांच्या तपशीलांचे पडताळणीसह डिजिटायझेशन करण्यात येत आहे.



जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांच्या निर्देशानुसार तसेच डॉ. सचिन खल्लाळ, उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी, ०८७ नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघ यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

या अनुषंगाने मनियार गल्ली, इतवारा परिसरात तहसीलदार तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी संजय वारकड यांनी बीएलओ व बीएलओ पर्यवेक्षकांसमवेत प्रत्यक्ष क्षेत्रभेट देऊन कामकाजाची पाहणी केली. यावेळी सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा उपअभियंता, विष्णुपुरी प्रकल्प शेख गुलाम, बीएलओ पर्यवेक्षक वडजकर, बीएलओ पवार तसेच तलाठी महेश जोशी उपस्थित होते.

यावेळी तहसीलदार संजय वारकड यांनी नागरिकांशी संवाद साधून प्रत्येक पात्र मतदाराने स्वतःचा तसेच कुटुंबातील सर्व सदस्यांचा गणना फॉर्म वेळेत भरून द्यावा, आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत आणि बीएलओमार्फत त्याचे तत्काळ डिजिटायझेशन करून घ्यावे, असे आवाहन केले. विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमासाठी कालावधी मर्यादित असल्याने बीएलओ आपल्या घरी भेट देतील तेव्हा त्यांना पूर्ण सहकार्य करावे, असेही त्यांनी सांगितले.

# नांदेडमध्ये गर्भवती महिलांचे महिन्याला ट्रॅकिंग; स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज

### सोनोग्राफी केंद्रांची होणार कसून तपासणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– गर्भलिंग निदान आणि स्त्रीभ्रूणहत्या या सामाजिक कलंकाला आळा घालण्यासाठी राज्य शासनाने सुरू केलेल्या मोहिमेची नांदेड जिल्ह्यात वेगाने अंमलबजावणी सुरू आहे. ज्या कुटुंबात पहिली किंवा दोन मुली आहेत अशा गर्भवती महिलांचे प्रसूतीपर्यंत नियमित ट्रॅकिंग करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, या मोहिमेला आता चार महिने पूर्ण झाले आहेत. यामुळे जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा पूर्णपणे ॲक्टिव्ह मोडवर आली आहे.

या मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण आणि शहरी भागातील आशा सेविका आणि अंगणवाडीताई यांच्यावर मुख्य जबाबदारी सोपवण्यात आली आहे. गर्भवती महिलेची नोंदणी झाल्यापासून प्रसूतीपर्यंत दर महिन्याला तिचा फॉलोअप घेतला जात आहे. विशेषतः पहिली किंवा दोन मुली असलेल्या कुटुंबातील गर्भवती महिलांवर विशेष लक्ष ठेवले जात आहे.

केवळ कायद्याने स्त्रीभ्रूणहत्या थांबत नसल्याचे लक्षात आल्यानंतर शासनाने थेट देखरेखीचे पाऊल उचलले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा गैरवापर करून छुप्या पद्धतीने होणारे गर्भलिंग निदान रोखण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील सर्व सोनोग्राफी केंद्रांची आरोग्य विभागाकडून बारकाईने तपासणी करण्यात येणार आहे. संशयास्पद प्रकरणांवर विशेष लक्ष ठेवून कडक कारवाई केली जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

जिल्ह्यातील दुर्गम आणि ग्रामीण भागातही आरोग्य अधिकारी स्वतः या मोहिमेचा आढावा घेत आहेत. आरोग्य कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. या मोहिमेमुळे जिल्ह्यातील मुलींच्या जन्मदरात वाढ होईल आणि बेकायदेशीर गर्भपाताच्या प्रवृत्तीला आळा बसेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# अचूक मतदार यादीसाठी बीएलओ यांना सहकार्य करा –भागवत देवसरकर

**नांदेड (प्रतिनिधी)**– निवडणूक आयोगाकडून सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेच्या अनुषंगाने प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण, प्रदेश सरचिटणीस सुनील राणे, प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे, चैतन्यबापू देशमुख, संयोजक नितीन काळे, नांदेड उत्तर जिल्हा प्रभारी किरण पाटील व नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनात व नेतृत्वात भारतीय जनता पार्टी हदगावचे तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांनी हदगाव तालुक्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच भाजपच्या बीएलए-२ यांना आपल्या बुथवरील बीएलओसोबत समन्वय ठेवून मतदारांच्या घरी भेटी देण्याचे आवाहन केले.



यावेळी बोलताना भागवत देवसरकर म्हणाले, अचूक मतदार यादी ही सक्षम लोकशाहीचा पाया आहे. प्रत्येक पात्र मतदाराची योग्य नोंद होणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. एकाही पात्र मतदाराचे नाव सुटू नये आणि अपात्र व्यक्तीचे नाव राहू नये यासाठी आपण सर्वांनी दक्ष राहिले पाहिजे. भारतीय जनता पार्टीच्या बीएलए-२, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गावागावात जाऊन मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना म्हणजेच बीएलओ यांना आवश्यक ती अचूक माहिती व कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत. घरातील नवीन १८ वर्षे पूर्ण झालेले, नाव कमी झालेले, पत्ता बदलले किंवा मृत्यू झालेल्या व्यक्तींची माहिती वेळेत देणे गरजेचे आहे.

आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत आणि त्रुटीमुक्त होईल. यामुळे निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक होण्यास मदत होईल. चला, सक्षम लोकशाहीसाठी आपण सर्वजण जबाबदारीने सहभागी होऊया, असे आवाहनही भागवत देवसरकर यांनी केले.

# जिल्हाधिकारी कर्डिले यांच्या उपस्थितीत 'एक पेड माँ के नाम' अंतर्गत देगलूर नाका परिसरात वृक्षारोपण संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)**– हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र अभियानांतर्गत तसेच एक पेड मॉ के नाम उपक्रमांतर्गत २ जुलै रोजी वन महोत्सवाचे औचित्य साधून सामाजिक वनीकरण विभाग नांदेडतर्फे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व विभागीय वन अधिकारी संदीप चव्हाण, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता राम गलधर, पशुसंवर्धन विभागाचे सहायक आयुक्त अरविंद गायकवाड, सहायक वन संरक्षण नितेश निगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांच्या हस्ते वन महोत्सव २०२६ या कार्यक्रमा अंतर्गत पशुवैद्यकीय दवाखाना देगलूर नाका येथील ०.४० हे. या घनवन रोपवनाचे उद्घाटन वृक्षारोपण करून करण्यात आले.




या याप्रसंगी पशुसंवर्धन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व सामाजिक वनीकरण विभागातील उच्च पदस्थ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच गिरीश लख्खेकर वनपरिक्षेत्र अधिकारी सामाजिक वनीकरण नांदेड, अशोक कॅंदरवाड वनपाल नांदेड, ज्ञानेश्वर मुंडे वनरक्षक नांदेड, सुभाष पिलाजी वनरक्षक नांदेड, बळवंत शिंदे वनरक्षक अर्धापूर यांनीही वृक्ष लागवड करून वन महोत्सवाची सुरुवात केली. तसेच पशुसंवर्धन विभाग परिसरामध्ये यावर्षीच्या वन महोत्सवामध्ये तब्बल१८ हजार वृक्ष लागवड करणार असल्याचे व यामध्ये विविध ३५ ते ४० प्रजातीचे झाडे घनवन पद्धतीने वृक्ष लागवड करण्यात येणार असल्याची माहिती गिरीश लख्खेकर वनपरिक्षेत्र अधिकारी नांदेड यांनी दिली.

## 'यशवंत'मधील डॉ. मीरा फड यांची आयआयपीएच्या स्वीकृत सदस्यपदी नियुक्ती

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील यशवंत महाविद्यालयातील डॉ. मीरा फड यांची आयआयपीएच्या स्वीकृत सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

नवी दिल्ली येथील आयआयपीए संस्थेचे २२ वर्षे राष्ट्रीय अध्यक्ष भारताचे माजी गृहमंत्री तथा आधुनिक भगीरथ कै. डॉ. शंकरराव चव्हाण होते. प्रस्तुत राष्ट्रीय संस्थेचे नांदेडचे जिल्हाधिकारी तथा आयआयपीएचे अध्यक्ष राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्र शाखा स्थापन करण्यात आली असून, त्यास केंद्रीय संस्थेने मान्यता प्रदान केली आहे. प्रशासकीय भवन परिसर, कौठा येथे स्वतंत्र कार्यालय सुरू करण्यात आले आहे.



नांदेडचे जिल्हाधिकारी तथा नांदेड शाखेचे पदसिद्ध अध्यक्ष राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी मंडळाची बैठक नुकतीच संपन्न झाली. या बैठकीमध्ये यशवंत महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागप्रमुख डॉ. मीरा फड यांची कार्यकारी मंडळात स्वीकृत सदस्यपदी निवड करण्यात आली आहे.

या सन्मानपूर्वक निवडीबद्दल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन.शिंदे, लेफ्टनंट डॉ.रामराज गावंडे, देगलूर महाविद्यालयातील डॉ. बालाजी कत्रुवार, डॉ. कविता सोनकांबळे, राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.अजय गव्हाणे, डॉ. विरभद्र स्वामी, डॉ. पद्मा राव, डॉ. संगीता शिंदे( ढेंगळे), डॉ. शबाना दुर्राणी, प्रा. राजश्री भोपाळे, डॉ. स्वाती मदनवाड, डॉ. रत्नमाला म्हस्के, डॉ. अजय मुठे, डॉ. शिवराज बोकडे, डॉ.भरत कांबळे, डॉ.संजय जगताप, डॉ. संदीप पाईकराव, प्रबंधक संदीप पाटील, अधीक्षक कालिदास बिरादार व गजानन पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

**पान १ वरून...**

**'वंदे भारत स्लिपर...'**

नवीन रेल्वे तर, नांदेड ते छत्रपती संभाजीनगर पॅसेंजर ट्रेन पूर्ववत सुरु करण्याची मागणी त्यांनी केली. याशिवाय गाड्यांची नियमित स्वच्छता सुनिश्चित करून राज्यराणी, नंदीग्रामसारख्या गाड्यांना आधुनिक 'एलएचबी' कोचेस लावण्याची सूचना त्यांनी केली.

रेल्वेच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांबाबत बोलताना नांदेड-लातूर रेल्वे मार्गाच्या विस्तृत प्रकल्प अहवालाचे काम वेगाने केल्याबद्दल रेल्वे विभागाचे त्यांनी अभिनंदन केले. नांदेड-बिदर प्रकल्पासाठी कर्नाटक सरकार निधी देण्यास अनुत्सुक असल्याने, कर्नाटकचे मुख्यमंत्री किंवा राज्यसभेतील विरोधी पक्षाचे मल्लिकार्जुन खरगे यांच्याशी चर्चा करून मार्ग काढण्याचा प्रयत्न करू, असे ते म्हणाले. नांदेड-लातूर, नांदेड- बिदर व बोधन-मुखेड-लातूर या तीन रेल्वे मार्गांना पूर्ण करण्यासाठी रेल्वे विभागाने पहिली प्राथमिकता द्यावी, असेही त्यांनी सुचवले.

शेतकरी आणि व्यापारी वर्गाच्या दृष्टीने त्यांनी मुदखेड येथील फुल उत्पादकांचा प्रश्न मांडला. मुदखेड परिसरातून मोठ्या प्रमाणात फुले हैदराबाद व मुंबईला जातात. नाशवंत माल असल्याने मुदखेड स्थानकावर मालाची चढ-उतार करण्यासाठी योग्य आणि पुरेशा वेळेचे थांबे द्यावेत. तसेच खतांच्या वाहतुकीसाठी जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय साधून नांदेड जिल्ह्यात खते उतरवण्यासाठी तीन-चार ठिकाणे निश्चित करावेत, ज्यामुळे वेळ आणि पैशांची मोठी बचत होईल.

प्रशासकीय धोरणांबाबत बोलताना त्यांनी 'वन डिस्ट्रिक्ट, वन डिव्हिजन' हे धोरण स्वीकारण्याची सूचना केली. महाराष्ट्राच्या हद्दीतील सर्व रेल्वे स्थानके नांदेड डिव्हिजनमध्येच ठेवावीत, नांदेड जिल्ह्याचा काही भाग हैदराबाद डिव्हिजनला जोडणे अयोग्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मागील वर्षी खासदारांची बैठक न झाल्याने यावर्षी आणखी सहा महिन्यांनी दुसरी बैठक घ्यावी, अशी मागणी केली. तसेच अनेक प्रश्न इतर झोन व रेल्वे बोर्डाशी संबंधित असल्याने या बैठकीला मध्य रेल्वे व रेल्वे बोर्डाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहतील, या दृष्टीने प्रयत्न करण्याची सूचना त्यांनी रेल्वे विभागाला केली.

रेल्वे उड्डाणपूल किंवा भुयारी मार्ग बांधताना पादचाऱ्यांना रुळ ओलांडता येईल यासाठी फूट ओव्हर ब्रिज अनिवार्य करण्याची मागणी त्यांनी केली. अनेक भुयारी मार्गांची रचना सदोष असल्याने तिथे पाणी साचून प्रवाशांना प्रचंड त्रास होतो, हे त्यांनी बैठकीत फोटोंसह निदर्शनास आणून दिले. स्थानक विकासांतर्गत नांदेड रेल्वे स्थानकावरील गोकूळनगर भागातील बाहेर निघण्याचा अरुंद मार्ग रुंदीकरण, तसेच रात्रीच्या वेळी रेल्वे स्थानकाच्या आत प्रवाशांना सहज ऑटोरिक्षा मिळण्यासाठी रेल्वे पोलिसांची तैनाती करून शिस्त लावणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा पळसगावात ग्रामीण मूल्यांकन उपक्रम

**नरसीफाटा (प्रतिनिधी)**– वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत नायगाव ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमाच्या माध्यमातून कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पळसगाव येथे सहभागी ग्रामीण मूल्यांकन उपक्रम राबवून गावाच्या विकासाचा आराखडा तयार केला.



या उपक्रमात विद्यार्थ्यांनी गावाची प्रत्यक्ष पाहणी करून रस्ते, शाळा, पाण्याचे स्रोत, लागवडीखालील क्षेत्र, शेतीपुढील अडचणी तसेच पिकांवरील किडी व रोगांचा अभ्यास केला. त्यानंतर गावाचा नकाशा तयार करून ग्रामस्थांशी संवाद साधत विविध समस्यांवर चर्चा केली.

यामध्ये विद्यार्थ्यांनी पळसगाव या गावाची माहिती गोळा करून त्या गावाचा नकाशा काढला. त्यामध्ये त्यांनी गावचे रस्ते, शाळा, पाण्याचे स्रोत, लागवडीखालील जमीन, सद्यस्थितीमध्ये शेती पिकावर पडणाऱ्या समस्या व पिकावर किडी व रोग इत्यादी गोष्टी दाखवण्यात आल्या व त्याविषयी विद्यार्थ्यांनी गावकऱ्यांशी चर्चा केली. पीआरएच्या माध्यमातून कृषीदूत श्रीनिवास माधव आडबे यांनी उपस्थित गावकऱ्यांचा सन्मान करून गावच्या विकासाचा दृष्टिकोन मांडला व गावचा आराखडा गावकऱ्यांना समजून सांगितला. सहभागी ग्रामीण मूल्यांकन (पीआर) या कार्यक्रमाला वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी प्रतिनिधी डॉ. पी. के. राठोड, सरपंच सौ. यशोदा कांबळे, साहेबराव कांबळे, उपसरपंच दत्ता पाटील शिंदे, अरविंद पाटील शिंदे, माधव पांचाळ, विठ्ठल पांचाळ, कोंडीबा पाटील शिंदे, नामदेव पाटील शिंदे, बळवंत पाटील शिंदे, माधव पाटील शिंदे, गोपीनाथ पाटील शिंदे व ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुरज वाघमारे, कृष्णा शिंदे, हर्षिकेश पवळे, अनिकेत पोरडवाड, करण वराडे, ज्ञानेश तुरुप, श्रीनिवास अडाबे, स्वप्नील वाघमारे, अश्फाक मोहम्मद, विनय कल्याणकर यांनी प्रयत्न केले. ग्रामीण कृषी कार्यानुभव (आरएडब्ल्यूए) अंतर्गत संस्थेचे अध्यक्ष खा. प्रा. रवींद्र पा. चव्हाण, संस्थेचे संचालक आर.सी. लव्हेकर, प्राचार्य डॉ. आर. जी. नादरे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपप्राचार्य नागेश घुबे, रावे समन्वयक प्रा. शंकर नागणीकर, रावे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. एस. ए. शेंडगे यांच्या उपस्थितीत सहभागी ग्रामीण मूल्यांकन (रावे) हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

# शिवार



# पावसाळ्यात जनावरांचे संरक्षण

## फऱ्या, तिवा, घटसर्प रोगाची लक्षणे ओळखा

**पावसाळ्यात जनावरे आजारी पडण्याचे व त्यामुळे होणाऱ्या मरतुकीचे प्रमाण सर्वाधिक असते. जनावरांना रोगाचा प्रादुर्भाव झाल्यावर उपचार करण्यापेक्षा या रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून अधिक काळजी घेणे अधिक हितकारक ठरते.**

अतिवृष्टीमुळे वातावरणातील ओलावा, सूर्यप्रकाशाचा अभाव, ढगाळ वातावरण गोठ्यातील ओलावा चारापाण्याची ढासळलेली प्रत या एकूणच परिस्थितीमुळे जनावरांच्या शरीर प्रक्रियेवर ताण पडतो. जनावरांमध्ये आजारांचे प्रमाण किंवा साथीचे रोग जसे घटसर्प, फऱ्या इत्यादी उद्‌भवतात. अशा वेळी शक्य असल्यास आंबवणाचे प्रमाण वाढवून द्यावे. प्रामुख्याने दुभत्या आणि व्यायला झालेल्या गाई, म्हशींची अन्नघटकांची शारीरिक मागणी पूर्ण करण्याकरिता आंबवण्याचे प्रमाण वाढवणे आवश्यक आहे. जनावरांना पावसाळा सुरू होण्यापूर्वी जंतनाशकाची मात्रा द्यावी. त्यामुळे जनावरांच्या पोटातील जंत निर्मूलनाने जनावरांची पचनशक्ती व त्यामुळे एकंदरीत शरीरप्रकृती उत्तम राहण्यास मदत होते. त्याकरिता उपलब्ध असलेल्या विविध कृमिनाशकांपैकी पशुवैद्यकाच्या सल्ल्याने योग्य कृमिनाशक पाजावे. (उदा. गाभण जनावरासाठी फेनबेंडेझॉल व इतरासाठी अलबेंडेझॉल) पोटातील कृमी किंवा शरीरातील जंताप्रमाणेच अंगावर आढळणाऱ्या डास, गोचीड, गोमाशा, उवा यापासूनही जनावरांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. कारण त्यामुळे जनावरांना गोचीड ताप, डेंगी यासारखे आजार होऊ शकतात. जनावरे दिवसा कोरड्या जागेवर मोकळ्या हवेत बांधावीत. त्यामुळे गोठ्यातील फरशी, जागा कोरडी होण्यास मदत होईल. तसेच गोठ्यात दिवसा भरपूर सूर्यप्रकाश पोहोचेल याची काळजी घ्यावी. गोठ्यातील भिंती व गव्हाण यांना असलेल्या कड्याकपारी दुरुस्त करून बुजवून घ्याव्यात. परजीवींचे प्रमाण जास्त असल्यास पशुवैद्यकाकडून योग्य ते उपचार करावेत. पावसाळ्यात जनावरांना फऱ्या, घटसर्प, लाळ्या खुरकूत, गोचीड ताप हे रोग प्रामुख्याने होतात. या सर्व रोगाकरिता लस उपलब्ध असून याचे लसीकरण करावे. लसीकरणापूर्वी कृमिनाशक औषधे व परजीवी कीटकांचे निर्मूलन केलेले असणे आवश्यक आहे. कासदाह सारखे कासेचे आजार जनावरांना पावसाळ्यातच जास्त प्रमाणात होतात. त्यामुळे कासेची स्वच्छता राखणे हाच प्रतिबंधात्मक उपाय सर्वात जास्त परिणामकारकपणे प्रतिबंध करू शकतो. त्याकरिता जनावरांचे दूध काढून झाल्यावर दिवसातून दोन्ही वेळेस सर्व सड जंतुनाशकामध्ये बुडवून धरल्यास फायदा होतो. या पद्धतीला टिट डिपिंग म्हणतात. त्याकरिता लागणारे जंतुनाशक बाजारात विविध नावाने उपलब्ध आहे. अतिवृष्टीमुळे आलेल्या पुरामुळे किंवा जागोजागी साठलेल्या गढूळ पाण्यामुळे तयार झालेल्या पाणवठ्यातील पाणी दूषित झालेले असते. पिण्याच्या पाण्याद्वारे जनावरांमध्ये रोगराई पसरू नये म्हणून विहिरीचे पाणी किंवा नळाचे पाणी जनावरांचा पिण्यास द्यावे. गोठ्याच्या आसपास छोटे छोटे खड्डे



होऊन त्यात पाणी साचू नये यासाठी या खड्ड्यांमध्ये मुरुम टाकावा. गोठ्यामध्ये खाचखळगे असल्यास तेथे पाणी साठून सारखी ओल राहते. त्यातच जनावरांचे शेण व मूत्र खळग्यामध्ये साठून मोठ्या प्रमाणावर दलदल निर्माण होऊन कासदाह होण्याची शक्यता जास्त असते. तेव्हा सर्व खाचखळगे मुरमाने भरून घ्यावेत. झपाट्याने वाढणारा कोवळा हिरवा चारा जनावरांना अत्यंत कमी प्रमाणात इतर चाऱ्याबरोबर द्यावा. कारण अशा कोवळ्या चाऱ्यामुळे जनावरांमध्ये अपचन, पोटफुगीचे आजार उद्‌भवतात. तसेच चाऱ्यात पाण्याचे प्रमाण जास्त असल्यामुळे जनावरे बुळकंडतात. पूर्वी उगवलेले गवत आणि आता झपाट्याने वाढणारे गवतसुद्धा दूषित झालेले असते. या चाऱ्यावर जनावरे न चारता शेतातील बांधाच्या उंचवट्यावरचे गवत आणि वाळलेला कोरडा चारा (साठवून ठेवलेला) जनावरांना द्यावा. कोवळी ज्वारी, टणटणी, घाणेरी व कण्हेर आदी विषारी वनस्पती जनावरांच्या चाऱ्यात जाणार नाही याची काळजी घ्यावी.

### पावसाळ्यातील आजार अन् उपचार...

- फऱ्या : या रोगाची लक्षणे म्हणजे एकाकी ताप येतो, मागचा पाय लंगडतो. मांसल भागाला सूज येते. सूज दाबल्यास चरचर आवाज येतो. या रोगासाठी प्रतिबंधक करण्यासाठी दरवर्षी सुरुवातीला जनावरांना लसीकरण करून घ्यावे.
- घटसर्प : या रोगात जनावर एकाएकी आजारी पडते. खाणे पिणे बंद होते. अंगात ताप भरतो. गळ्याला सूज येऊन डोळे खोल जातात. घशाची घरघर सुरू होते. या रोगासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणजे दरवर्षी पावसाळ्यापूर्वी निरोगी जनावरांना ऑईल अडज्युव्हट एच. एस. तेलयुक्त लस टोचून घ्यावी.
- कासदाह : या रोगामध्ये सडाला तसेच कासेला सूज येते. दूध अतिपातळ, रक्त पूमिश्रित येते, जनावर कासेला हात लावू देत नाही. दूध काढण्यापूर्वी जंतूनाशकाने कास धुवावी. अधून मधून कासदाह रोगासाठी दुधाची तपासणी करून घ्यावी. गायी किंवा म्हशी आटविण्याच्या शेवटच्या दिवशी सडात अँटिबायोटिक्स ट्यूब्ज सोडाव्यात.
- थायलेरियॉसिस : या रोगात जनावरांना सतत एक दोन आठवडे ताप येतो. जनावर खंगत जाते. जनावर आंबवण (खुराक) खात नाही. घट्ट हगवण होते. इलाज न झाल्यास मृत्यू येतो. या रोगात प्रतिबंधक उपाय म्हणजे गोचीड, माशा वगैरेमुळे या रोगाचा प्रसार होतो. म्हणून गोठे स्वच्छ ठेवावेत. जनावरांच्या अंगावरही गोचीड प्रतिबंधक पावडर लावावी.
- तिवा : या रोगामध्ये जनावरास सडकून ताप येतो. जनावरांचे खाणे मंदावते. जनावर थरथर कापते. एका पायाने लंगडते. मान, पाठ, डोळे व पायाचे स्नायू आकुंचन पावतात. तिवा रोगाचा प्रतिबंध करण्यासाठी डासाचे निर्मूलन करावे.
- पोटफुगी : या आजारात जनावराची डावी कुस फुगते. जनावर बेचैन होते. खाणे व रवंथ करणे बंद करते. सारखी उठबस करते. टिचकीने आवाज केल्यास टमटम आवाज येतो. या रोगात प्रतिबंधक उपाय म्हणजे पावसाळ्यात ओला व कोवळा चारा अतिप्रमाणात देऊ नये.
- हगवण : या प्रकारात जनावरास एकसारखे साधे अगर रक्त व शेण मिश्रित पातळ



दुर्गंधीयुक्त शौचास होते. जनावर मलूल होते. अशुद्ध व घाणेरड्या चाऱ्यामुळे हा आजार उद्भवतो. हा आजार टाळण्यासाठी जनावरांना शुद्ध पाणी व चांगले खाद्य द्यावे.
- लिव्हर फ्ल्युक : या रोगात जनावराचे खाणे कमी होते. शेण पातळ होते. जनावराच्या खालच्या जबड्याखाली सूज येते. जनावरे खंगत जातात व दगावतात. या रोगात प्रतिबंधक उपाय म्हणजे सर्व जनावरांना दोन वेळा (पावसाळ्यापूर्वी व नंतर) जंताचे औषध पाजावे. पिण्यास नेहमी स्वच्छ पाणी द्यावे.

## नियंत्रण काळीपुळीचे!

**काळीपुळी रोग उष्ण प्रदेशात उन्हाळ्याच्या अखेरीस आणि पावसाळ्याच्या सुरुवातीस आढळतो. या रोगात मृत्यूचे जास्तीत जास्त प्रमाण आढळून येते. प्रतिबंधात्मक उपायांसोबतच लक्षणे आढळल्यास पशुवैद्यकाकडून त्वरित उपचार करून घेणे आवश्यक असते.**

बॅसिलस अँथ्रॅसिस या जिवाणूमुळे होणाऱ्या रोगाला काळीपुळी, फाशी असे म्हणतात. काळीपुळी हा रोग गाई, बैल, म्हशी, शेळी, मेंढ्या, घोडे, डुक्कर आदी प्राण्यांत आढळतो. लसीकरण आणि व्यवस्थापनातील स्वच्छतेमुळे सध्या काळीपुळी रोगाचा प्रादुर्भाव पूर्वीच्या तुलनेत कमी झाला आहे. किंबहुना हा रोग प्राण्यात जगभर सर्वत्र आढळतो. हा आजार प्राण्यापासून मानवाला देखील होऊ शकतो. बॅसिलस अँथ्रॅसिस जिवाणू लांबट असून त्यांची संरचना साखळीमध्ये असते. त्यामुळे बांबूच्या काठीसारखी दिसतात. हे जिवाणू जेव्हा हवेच्या किंवा ऑक्सिजनच्या संपर्कात येतात तेव्हा त्यांचे रूपांतर बीजाणू (स्पोर) मध्ये होते. बीजाणू स्वरूपात हे जंतू जमिनीत २० वर्षांपेक्षा अधिक कालावधीपर्यंत सुप्तावस्थेत जगू शकतात. या



बीजाणूंवर प्रतिकूल परिस्थितीचा परिणाम होत नाही. या जिवाणूच्या पेशीबाहेरील आवरणाचे आणि जिवाणूद्वारे निर्मित विषाची रोगनिर्मिती मध्ये महत्त्वाची भूमिका आहे.

- रोगाचा प्रसार : रोगी जनावरांचे केस, लोकर, हाडे, मास अथवा दूषित माती यांच्या संपर्काने, संसर्गित चारा आणि पाण्याद्वारे, उंदीर, घुशी किंवा चावक्या माश्याद्वारे अथवा बाधित जमिनीतून वाहत जाणाऱ्या पाण्याद्वारे रोगाचा प्रसार होतो. एकंदरीत यया जिवाणूंचा शिरकाव शरीरात मुख्यत्वे सेवनाद्वारे, श्वासातून किंवा त्वचेतून होतो आणि रोगनिर्मिती होते.
- रोगाचे निदान : प्रयोगशाळेत काळीपुळी रोगाचे निदान बाधित जनावरांचे रक्त आणि पेशीपासून करता येते. या रोगाचे नमुने हे हवेच्या आणि मनुष्याच्या संपर्कात न येतील अशा प्रकारे घेणे महत्त्वाचे आहे. नुकतेच मेलेल्या किंवा मृत्युपूर्व कानाच्या नीलेतून घेतलेले रक्त सूक्ष्मदर्शकाखाली तपासल्यास विशिष्ट गुण असलेले बॅसिलस अँथ्रॅसिस जिवाणू दिसतात. रोगाच्या निश्चित निदानासाठी रक्तातून जिवाणूंचे विलगीकरण करून ओळखतात तसेच अस्कॉलीस चाचणी आणि पीसीआर या चाचणीद्वारे या रोगाचे निदान करतात.
- उपचार कसे अन् कुठे... : बहुतांशवेळा काळीपुळी रोग तीव्र किंवा अतितीव्र स्वरुपात आढळत असल्यामुळे त्यामुळे बऱ्याच वेळी उपचारापूर्वीच जनावरे दगावतात. सौम्य प्रकारच्या आजाराच्या उपचारासाठी प्रतिजैविके उदा. स्ट्रेप्टोमायसिन, टेरामायसिन, ओरिओमायसिन दिल्यास तीन चार दिवसांत रोगाला उतारा पडतो. कळपातील आजारी मेंढ्याचे निदान करून घ्यावे. आजारी मेंढ्यांमध्ये लक्षणे आढळल्यास पशुवैद्यकाकडून त्वरित उपचार करून घ्यावा. या रोगात उपचारास प्रतिसाद कमी प्रमाणात मिळतो.

### लक्षणे कोणती?

उष्ण प्रदेशात उन्हाळ्याच्या अखेरीस आणि पावसाळ्याच्या सुरुवातीस उद्भवतो. रोगाची सुरुवात एकदम होते आणि जनावरांना ४१-४२ अंश सेल्सिअस ताप चढतो. जनावरे थरथर कापतात, चारा खाणे, रवंथ करणे तसेच दूध देणे बंद होते. गळ्यात सूज येते, श्वासोच्छवास जलद चालतो आणि जनावरे बेशुद्ध होतात. रक्ताचे जुलाब होतात, जनावर मलूल होऊन पडून राहते आणि २-३ दिवसांत दगावते. मेंढ्यांना रोग झाल्यास थोड्याच वेळात गरगर फिरू लागतात आणि अचानक दगावतात. घोड्यामध्ये पोटात कळा येतात, अस्वस्थ होऊन उठबस करतात आणि जमिनीवर पडून पाय झाडतात. रोगाचे विशिष्ट लक्षण म्हणजे काळ्या रंगाचा न गोठणाऱ्या रक्ताचा स्त्राव नाकातून किंवा अन्य छिद्रातून येतो. या रोगात मृत्यूचे जास्तीत जास्त प्रमाण आढळून येते. मानवात त्वचेसंबंधी, फुफ्फुसासंबंधी लक्षणे दिसून येतात.

### प्रतिबंध आणि उपाय

काळीपुळी संशयित जनावरांचे शवविच्छेदन करू नये. काळीपुळी हा अत्यंत घातक रोग आहे. त्यामुळे ज्या भागात या रोगाचा प्रादुर्भाव आहे, त्या ठिकाणच्या जनावरांचे नियमित लसीकरण करणे आवश्यक आहे. या रोगाची लस साधारणतः पावसाळ्यापूर्वी फेब्रुवारी ते मे महिन्याच्या दरम्यान देतात. ४ महिन्यांच्या वयोगटात आणि प्रतिवर्षी लस द्यावी. आजारी जनावरांना इतर जनावरांपासून वेगळे ठेवून त्यांची काळजी घ्यावी. दूषित झालेली जागा आणि इतर सर्व बाधित वस्तू जंतुनाशके वापरून निर्जंतुकीकरण करावे. हा रोग प्राण्यापासून किंवा त्यांच्या वस्तूपासून माणसामध्ये होतो म्हणून यांच्याशी संपर्कात येणारे पशुपालक, कामगार हे या रोगापासून सतर्क राहिले पाहिजे. मानवासाठी या रोगाची लस बायोथ्रॅक्स या नावाने उपलब्ध आहे.



## तेलबिया व कडधान्य प्रक्रिया उद्योगांना अनुदान

सोयाबीन, तीळ व इतर तेलबिया तसेच तूर, मूग, उडीद, हरभरा आदी कडधान्य पिकांचे काढणीनंतर होणारे नुकसान कमी करून स्थानिक स्तरावर प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी कृषी विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. केंद्र व राज्य शासनाच्या राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया (NMEO-OS) आणि कडधान्य आत्मनिर्भरता अभियान २०२६-२७ अंतर्गत प्रक्रिया युनिट्स, मिनी ऑईल मिल, गोदाम बांधकाम व कडधान्य प्रक्रिया- पॅकेजिंग युनिट्स उभारण्यासाठी लाखो रुपयांचे अनुदान उपलब्ध करून देण्यात आले असून, पात्र लाभार्थ्यांकडून ऑफलाइन अर्ज मागविण्यात आले आहेत. योजनेअंतर्गत २५० मेट्रिक टन क्षमतेच्या गोदाम बांधकामासाठी सुमारे २८.८० लाख रुपयांचा प्रकल्प खर्च निश्चित करण्यात आला आहे. यासाठी पात्र लाभार्थ्यांना प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल १४.४० लाख रुपये इतके अनुदान दिले जाणार आहे. शेतकरी उत्पादक संस्था (एफपीओ/एफपीसी), सहकारी संस्था, सार्वजनिक व खासगी उद्योग तसेच समूह आधारित व्यवसाय संस्था या योजनेसाठी पात्र असून मूल्यसाखळी भागीदारांना प्राधान्य दिले जाणार आहे. लाभार्थ्यांची निवड प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर केली जाणार आहे. इच्छुक लाभार्थ्यांनी विहित नमुन्यातील ऑफलाइन अर्ज संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात आवश्यक कागदपत्रे व जीएसटी नोंदणीकृत पुरवठादारांचे अधिकृत दरपत्रक जोडून सादर करावेत.

## कोंबड्यांना श्वसन रोग!

**पावसाळ्यामध्ये वातावरणातील दमटपणा वाढलेला असतो. त्यामुळे कोंबड्यांमध्ये श्वसन रोग होण्याची शक्यता असते. तसेच डास, माश्यांच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे देखील कोंबड्यांमध्ये विविध आजारांचा प्रसार होतो.**

सध्याच्या पावसाळी वातावरणात जिवाणू आणि विषाणूच्या वाढीसाठी पोषक वातावरण तयार होते. त्यामुळे कोबड्यांच्यामध्ये रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. अशा वेळेस कोंबड्यांच्या व्यवस्थापनामध्ये बदल करावे लागतात. पावसाळ्यामध्ये वातावरणातील दमटपणा वाढलेला असतो. त्यामुळे कोंबड्यांमध्ये श्वसन रोग होण्याची शक्यता असते. तसेच डास, माश्यांच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे देखील कोंबड्यांमध्ये विविध आजारांचा प्रसार होतो.



### परसबागेतील कुक्कुटपालन

वजनवाढ, वर्षाला मिळणारे अंडी उत्पादन व विक्रीसाठी उपलब्ध बाजारपेठ या बाबी लक्षात घेऊन परसबागेसाठी कोंबड्यांची जात निवडावी. परसबागेतील कुक्कुटपालनासाठी मुख्यतः वनराजा, गिरिराजा, सातपुडा इत्यादी जातींची निवड करावी. परसबागेत कोंबड्यांचे संगोपन करताना बरेच शेतकरी या कोंबड्यांना कोणतेही लसीकरण करून घेत नाहीत. यामुळे गावात एखाद्या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव कोंबड्यांना झाली की गावातील गावरान कोंबड्यांची मोठ्या प्रमाणात मरतूक होते. म्हणून या कोंबड्यांना किमान राणीखेत, गंबोरो, पॉक्स (देवी), आय.बी. इत्यादी रोगप्रतिबंधक लसीकरण करून घ्यावे. जेणेकरून कोंबड्यांची मरतूक कमी होऊन नुकसान होणार नाही. घार, कुत्रे, मांजर इत्यादी प्राणी-पक्षांपासून संरक्षणासाठी जाळीच्या कंपाउंडमध्ये व वरून शेडनेट लावून कोंबड्यांचे संगोपन करावे. कोंबड्यांना ज्या ठिकाणी सतत ओलावा, दलदल असते अशा ठिकाणी सोडू नये. त्यामुळे ओलसरपणा व दलदलीमुळे कॉक्सिडीओसीस आजाराचा धोका वाढतो. जंत प्रादुर्भावामुळे कोंबड्यांची मरतूक होऊ शकते. सतत उकिरडे, शेत, गोठे या ठिकाणी फिरण्यामुळे कोंबड्यांमध्ये जंताचा प्रादुर्भाव होण्याची जास्त शक्यता असते. हे टाळण्यासाठी वेळोवेळी कोंबड्यांना जंताचे औषध द्यावे. बाहेर फिरणाऱ्या कोंबड्यांना त्यांच्या शारीरिक गरजेप्रमाणे क्षार व जीवनसत्वांचा पुरवठा होत नाही. त्यामुळे कमतरतेचे आजार दिसून येतात. या बाबी टाळण्यासाठी महिन्यातून किमान एक ते दोन वेळा जीवनसत्त्व, क्षारयुक्त द्रावणाचा कोंबड्यांच्या आहारात वापर करावा.

### असे करा व्यवस्थापन

पावसाळ्यामध्ये पोल्ट्री शेडच्या आजूबाजूची जागा स्वच्छ करून घ्यावी. शेडच्या बाजूंनी वाढलेले गवत काढून घ्यावे. पोल्ट्री शेडच्या आजूबाजूला पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी. पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी पोल्ट्री शेडच्या बाजूने चर खोदावेत. जेणेकरून तिथे पाणी साचून राहणार नाही. शेडचे छप्पर भिंतीपासून पुढे आलेले असावे. जेणेकरून पाऊस शेडच्या आतमध्ये येणार नाही. पोल्ट्री शेडची पत्रे गच्च बांधून घ्यावेत. त्यामुळे जोरदार पावसात किंवा वादळात उडून जाणार नाहीत. नवीन पिल्ले शेडमध्ये ठेवण्याच्या अगोदर चुना मारून घ्यावा. शेड मध्ये माश्यांचा प्रादुर्भाव वाढणार नाही याची दक्षता घ्यावी. पावसाळ्यामध्ये शक्यतो प्लास्टिकचे पडदे वापरावेत. पडदे शेडच्या बाजूच्या लोखंडी जाळीला दोरीने मजबूत बांधलेले असावेत. पडद्यांची उघडझाप पावसाप्रमाणे करावी. दिवसा पाऊस नसेल आणि सूर्यप्रकाश असेल तर पडदे उघडावेत. पडद्यांची बांधणी ही छताच्या पायापासून ते दीड फूट अंतर सोडून असावी. यामुळे शेडमधील वरील बाजूने शेडमध्ये हवा खेळती राहून वातावरण चांगले राहते. कोंबड्यांना त्रास होत नाही. शेडचे छप्पर गळके नसावे. नाहीतर लिटर ओले होण्याची शक्यता असते. शेडमधील लिटर दिवसातून दोनदा चांगल्या प्रकारे हलवून घ्यावे. जेणेकरून त्यामध्ये जंतूंचा प्रादुर्भाव वाढणार नाही. लिटर ओले राहणार नाही याची दक्षता घ्यावी. लिटर ओले राहिल्यास त्यामधून विविध आजार होण्याची शक्यता असते. ओलाव्यामुळे कोंबड्यांमध्ये कॉक्सिडीऑसीस आजाराचे प्रमाण वाढण्याची शक्यता असते. लिटर जास्त ओले झाल्यास बदलावे. कोंबड्यांचे खाद्य ठेवण्याची जागा स्वच्छ व कोरडी असावी. प्रत्येक वेळेस खाद्याची तपासणी करावी,त्यानंतर खाद्य खाण्यास द्यावे. ओलाव्यामुळे खाद्याला बुरशी लागण्याची शक्यता असते. खाद्य आणि पिण्याच्या पाण्याची भांडी स्वच्छ ठेवावी. पिण्यास स्वच्छ पाणी द्यावे. तसेच पाण्यामध्ये जंतुनाशकाचा वापर करावा. पावसाळ्यामध्ये पाणी दूषित होण्याची जास्त शक्यता असते. त्यातून विविध आजार होण्याची देखील शक्यता अधिक असते. शेडच्या बाहेर फूटबाथ चा वापर करावा. रोगप्रसार टाळण्यासाठी बाहेरील व्यक्ती तसेच वाहन यांचा शेडच्या आवारात प्रतिबंध करावा. मेलेल्या कोंबड्यांना उघड्यावर फेकू नये. त्यांना खड्ड्यामध्ये पुरावे. यामुळे संसर्ग पसरण्याचा धोका टळतो. वेळोवेळी पशुवैद्यकीय सल्ला घ्यावा.



## रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



## पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाची व्यापक जनजागृती करावी -जिल्हाधिकारी कर्डिले

**नांदेड (प्रतिनिधी)-** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार नांदेड जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाची माहिती प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचविण्यासाठी सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सनी सक्रिय सहभाग घ्यावा आणि विविध डिजिटल माध्यमांतून व्यापक जनजागृती करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीत विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाची उद्दिष्टे, अंमलबजावणीची प्रक्रिया, नागरिकांची भूमिका आणि जनजागृतीचे महत्त्व याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी उपजिल्हाधिकारी राजकुमार माने, युवा अधिकारी अश्नी कानकटे, जिल्हा माहिती कार्यालयाच्या उपसंपादक अलका पाटील, निवडणूक विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी राहुल कर्डिले म्हणाले की, लोकशाही व्यवस्थेचा पाया सक्षम मतदार यादीवर अवलंबून असतो. त्यामुळे प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट होणे, मतदार यादीतील त्रुटी दूर करणे, आवश्यक दुरुस्त्या करणे तसेच स्थलांतरित किंवा मृत मतदारांची नावे नियमानुसार वगळणे ही अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. या कामात नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सची भूमिका प्रभावी ठरू शकते. आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया हे जनसंपर्काचे प्रभावी माध्यम बनले आहे. इन्फ्लुएन्सर्सच्या माध्यमातून कमी वेळात मोठ्या संख्येने नागरिकांपर्यंत विश्वासार्ह माहिती पोहोचविणे शक्य आहे. त्यामुळे फेसबुक, इन्स्टाग्राम, यूट्यूब, एक्स (ट्विटर) तसेच इतर डिजिटल प्लॅटफॉर्मवर जिल्हा प्रशासन आणि भारत निवडणूक आयोगाकडून प्रसिद्ध करण्यात येणारी अधिकृत माहिती नियमितपणे प्रसारित करावी. कोणत्याही अफवा किंवा अप्रमाणित माहितीला बळी न पडता नागरिकांपर्यंत केवळ सत्य आणि अधिकृत माहिती पोहोचविण्याची जबाबदारी सर्वांनी पार पाडावी, असे आवाहन त्यांनी केले.

विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम हा केवळ प्रशासकीय उपक्रम नसून लोकशाही अधिक मजबूत करण्याचा महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे युवक, प्रथमच मतदान करणारे मतदार, महिला तसेच ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत या मोहिमेची माहिती पोहोचविण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी केले. बैठकीत उपस्थित इन्फ्लुएन्सर्सनी जिल्हा प्रशासनाच्या या उपक्रमाला पूर्ण सहकार्य करण्याची ग्वाही दिली. विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर माहितीपर व्हीडीओ, पोस्ट, रील्स आणि जनजागृती संदेश प्रसारित करून विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम अधिक प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

यावेळी प्रत्यक्ष गणनापत्र कसे स्कॅन करायचे. कशी माहिती भरायची, अर्जाचे डिजिटायझेशन कसे करायचे याबाबत प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. नांदेड जिल्ह्यात राबविण्यात येणारे विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाबाबत सविस्तर माहिती उपजिल्हाधिकारी राजकुमार माने यांनी दिली.

# 'नांएसो'च्या आर्थिक मदतीसाठी मुख्यमंत्र्यांकडे विनंती करणार -आ. अमरनाथ राजूरकर

**नांदेड (प्रतिनिधी)-** स्वामी रामानंद तीर्थ यांनी स्थापन केलेल्या नांदेड एज्युकेशन सोसायटीला राज्य शासनाने आर्थिक सहाय्य करावे, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन विनंती करणार असल्याची ग्वाही विधान परिषदेचे नवनिर्वाचित आमदार अमरनाथ राजूरकर यांनी सोमवारी दिली. पीपल्स कॉलेजच्या विकासासाठी आमदार निधीतून दहा लाख रुपयांची मदत जाहीर करतानाच, सोसायटीला दरवर्षी आर्थिक सहाय्य करण्याची घोषणाही त्यांनी केली.



पीपल्स कॉलेजचे माजी विद्यार्थी असलेल्या आ. अमरनाथ राजूरकर यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन नरहर कुरुंदकर सभागृहात करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील होते. मंचावर संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल अग्रवाल, सचिव प्रा. श्यामल पत्की-कुरुंदकर, सहसचिव ॲड. प्रदीप नागापूरकर, अल्युमनी असोसिएशनचे सचिव डॉ. बालाजी कोंपलवार, प्रवीण साले, प्राचार्य डॉ. विकास सुकाळे आदी उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना आ. राजूरकर म्हणाले, स्वामी रामानंद तीर्थ यांनी स्थापन केलेल्या नांदेड एज्युकेशन सोसायटीचा इतिहास गौरवशाली आहे. पीपल्स कॉलेजमध्ये माझे शिक्षण झाले. ज्या संस्थेने मला घडवले, त्याच ठिकाणी होत असलेला हा सत्कार माझ्यासाठी आनंदाचा क्षण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीला राज्य शासनाने आर्थिक मदत दिल्याप्रमाणेच नांदेड एज्युकेशन सोसायटीलाही सहाय्य मिळावे, यासाठी मुख्यमंत्र्यांकडे विनंती करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थेच्या सचिव प्रा. श्यामल पत्की-कुरुंदकर यांनी मराठवाड्यातील शिक्षणाच्या उभारणीत नांदेड एज्युकेशन सोसायटी आणि पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या योगदानाचा आढावा घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीला ५०० कोटी रुपयांची मदत जाहीर केल्याप्रमाणे स्वामी रामानंद तीर्थ यांच्या संस्थेलाही शासनाने आर्थिक सहाय्य करावे, अशी मागणी त्यांनी केली.

## अवैध व्यवसाय निर्मूलन मोहिमेत ७१ इसमांविरुद्ध कारवाई; ७० लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**नांदेड (प्रतिनिधी)-** पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दि. १ ते ३१ जुलै दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात अवैध दारू, गुटखा, मटका, जुगार, अंमली पदार्थ, घातक शस्त्रे इत्यादी विरोधी मोहीम राबविण्याचे निश्चित केले आहे.

या मोहिमेच्या पाचव्या दिवशी नांदेड परिक्षेत्रात, गुटखा विक्री करणाऱ्या ४ इसमांविरुद्ध २ गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून ७ लाख १० हजार ८१५ रुपये किंमतीचा गुटखा व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत ८ इसमांविरुद्ध कारवाई करून त्यांचे विरुद्ध २ गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून २ लाख २२ हजार ३३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर, अवैध दारू विक्री करणाऱ्या ५० आरोपींविरुद्ध ५० गुन्हे दाखल करून, त्यांच्याकडून ६४ हजार ११० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर कारवाई सोबतच, कोटपा अन्वये १, तर इतर अधिनियमाखाली मिळून, एकूण ६० कारवाया करण्यात आल्या असून, यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून ७० लाख ६० हजार ६४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# मनपाकडून नागरिकांना मिळणार ऑनलाईन गुंठेवारी प्रमाणपत्र

**नांदेड (प्रतिनिधी)-** शहरातील नागरिकांचा वेळ वाचवण्यासाठी आणि प्रशासकीय कामात पारदर्शकता आणण्यासाठी महानगरपालिकेने गुंठेवारी नियमितीकरण प्रक्रियेला पूर्णपणे हायटेक केले आहे. आता नागरिकांना गुंठेवारी प्रमाणपत्रासाठी महापालिकेच्या चकरा मारण्याची गरज नसून, ही सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आली आहे.



या नवीन डिजिटल प्रणालीद्वारे तयार करण्यात आलेल्या पहिल्या ऑनलाईन गुंठेवारी प्रमाणपत्रांचे वितरण नुकतेच महापौर कविता मुळे आणि पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे व इतर प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत महापालिका मुख्यालयात आयोजित एका विशेष कार्यक्रमात लाभार्थ्यांना सुपूर्द करण्यात आले.

या प्रसंगी उपमहापौर दीपकसिंह रावत, स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, महिला बालकल्याण सभापती सदिच्छा सोनी, उपसभापती निरंजना लांडगे, गटनेता संदीपसिंग गाडीवाले, साबेर चाऊस तसेच अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त अजितपालसिंघ संधु, उपायुक्त अभिजीत वायकोस गुंठेवारी कक्षाचे उपअभियंता, कनिष्ठ अभियंता आणि तांत्रिक कर्मचारी उपस्थित होते.

नांदेड- वाघाळा शहर महानगरपालिकेने नागरिकांसाठी एक महत्त्वपूर्ण आणि डिजिटल पाऊल उचलत ऑनलाईन गुंठेवारी प्रमाणपत्र देण्याची सुविधा सुरू केली आहे. या सुविधेचा अधिकृत शुभारंभ करताना महापालिका प्रशासनामार्फत प्रातिनिधीक स्वरुपात हनुमंत नरसिंगराव बोदरवाड, गणेश चंद्रय्या कटकम, दीपक कांबळे, गजानन चक्रवार, संजीवकुमार तळवणे व रामदास वावधाने या नागरिकांना पहिल्या ऑनलाईन गुंठेवारी प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

या ऑनलाईन प्रणालीमुळे नागरिकांना आता घरबसल्या किंवा अधिकृत आर्किटेक्ट/इंजिनिअरमार्फत आपले प्रस्ताव थेट ऑनलाईन सादर करता येतील. त्यामुळे त्यांच्या वेळेची आणि पैशांची बचत होणार आहे. त्याचप्रमाणे मानवी हस्तक्षेप कमी झाल्यामुळे कामात गती येईल आणि गैरप्रकारांना आळा बसेल. या गुंठेवारी प्रमाणपत्रांवर सक्षम प्राधिकाऱ्यांची डिजिटल स्वाक्षरी असेल, ज्यामुळे हे प्रमाणपत्र सर्व शासकीय कामांसाठी वैध ठरेल. ऑनलाईन प्रणालीमुळे अर्जाची सद्यस्थिती तपासणे आणि आवश्यक विकास शुल्क ऑनलाईन भरण्याची सुविधा यामध्ये उपलब्ध आहे.

महापालिकेकडील नोंदणीकृत आणि परवानाधारक आर्किटेक्ट, इंजिनिअर किंवा सुपरवायझर यांच्या माध्यमातून ऑनलाईन प्रस्ताव दाखल करावा लागेल. अर्जासोबत विहित नमुन्यातील कागदपत्रे, भूखंडाचा नकाशा आणि छाननी शुल्क सादर करावे लागेल. महापालिकेच्या गुंठेवारी कक्षातील तांत्रिक अधिकाऱ्यांमार्फत प्रस्तावाची आणि जागेची ऑनलाईन छाननी केली जाईल. प्रस्ताव पात्र ठरल्यानंतर नागरिकांना ऑनलाईन चलन जनरेट होईल, ज्याची रक्कम भरल्यानंतर तात्काळ डिजिटल स्वाक्षरीयुक्त गुंठेवारी प्रमाणपत्र डाऊनलोड करता येईल.

## मंगला जोशी यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)-** शहरातील विजयनगर भागातील रहिवासी मंगला कमलाकरराव जोशी (महागावकर) यांचे ५ जुलै रोजी रात्री हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी सकाळी ११.३० वाजता गोवर्धनघाट येथील शांतीधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात मुलगा, सून, मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या आनंद जोशी यांच्या मातोश्री होत.

# नांदेडच्या लोहमार्ग पोलिसांकडून तीन गुन्ह्यांचा उलगडा

**नांदेड (प्रतिनिधी)-** लोहमार्ग पोलीस ठाणे नांदेडच्या गुन्हे शोध पथकाने रेल्वेमध्ये गळ्यातील सोन्याची चैन हिस्कावून चोरी करणाऱ्या चोरट्याला जेरबंद केले आहे. आरोपीकडून ३ वेगवेगळ्या गुन्ह्यांतील एकूण ४ लाख ८० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तक्रारदार मयादम नागमणी, रा. निजामाबाद, तेलंगणा हे दि. २४ मे २०२६ रोजी अजंठा एक्स्प्रेसने कामारेडीला जात होते. पहाटे ४ वाजता उमरी रेल्वे स्थानकावर गाडी थांबली असता एका अनोळखी व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील ३० ग्रॅम वजनाची, ४ लाख २० हजार रुपये किमतीची सोन्याची साखळी हिसकावून पळ काढला होता. याप्रकरणी लोहमार्ग पोलीस ठाणे नांदेड येथे गु.र.नं. ३१७/२०२६, भा. न्यायसंहिता कलम ३०४(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक प्रकाश वाघमारे करीत होते. गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे



पथकाने संशयित आरोपी कृष्णा गणेश अंकमवार (वय २१ वर्षे, रा. गोविंदनगर, महाराणा चौक, तरोडा (बु), नांदेड) याला ताब्यात घेतले. कसून चौकशीत त्याने सदर गुन्हा आपला मित्र अनिकेत, रा. चौफाला, नांदेड याच्यासोबत केल्याचे कबूल केले.

आरोपींकडून वरील गुन्ह्यातील ३ तोळ्याची सोन्याची चैन जप्त करण्यात आली. पुढील तपासात आरोपीकडून लोहमार्ग पोलीस ठाणे नांदेड येथील आणखी दोन गुन्ह्यांचा उलगडा झाला. इतर २ गुन्हेही उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले.

# धारदार तलवारीसह तरुण अटकेत

**नांदेड (प्रतिनिधी)-** शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या विशेष मोहिमेत इतवारा पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने धारदार शस्त्र बाळगणाऱ्या एका युवकाला अटक केली आहे.

दि. ५ जुलै रोजी रात्री दहाच्या सुमारास इतवारा पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, एक युवक हैदरबाग पाण्याच्या टाकीजवळ हातात तलवार घेऊन संशयास्पदरीत्या फिरत आहे. या माहितीच्या आधारे पंचांसमक्ष तत्काळ छापा टाकण्यात आला. कारवाईदरम्यान तमजीद खान अब्बास खान (वय २० वर्षे, रा. पीरनगर, ह.मु. मिल्लतनगर, नांदेड) याला ताब्यात घेण्यात आले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे सुमारे ३३ इंच लांबीची लोखंडी धारदार तलवार आढळून



आली. अंदाजे ५०० रुपये किंमतीची ही तलवार पोलिसांनी जप्त केली.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध इतवारा पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास इतवारा पोलीस करत आहेत. ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक सूरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे, पोलीस निरीक्षक रामेश्वर खनाळ, पोलीस निरीक्षक संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकातील पोउपनि. प्रवीण आगलावे, पोलीस अंमलदार बंडू कलंदर, इस्माईल आणि सुखई यांनी पार पाडली.

# मनपात संत गुलाबराव महाराज यांना अभिवादन

**नांदेड (प्रतिनिधी)-** महापालिकेच्या वतीने महान तत्त्वज्ञ, संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक 'संत गुलाबराव महाराज' यांच्या जयंतीनिमित्त सोमवार, दि. ६ जुलै रोजी सकाळी ११ वाजता त्यांच्या प्रतिमेस महापौर कविता मुळे आणि पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.



संत गुलाबराव महाराज हे विसाव्या शतकातील महाराष्ट्रातील एक अत्यंत अलौकिक, प्रज्ञाचक्षू संत, थोर तत्त्वज्ञ आणि महान मराठी लेखक होते. वयाच्या अवघ्या नवव्या महिन्यात दृष्टी गेल्यानंतरही त्यांनी अंतर्दृष्टीने वेद, उपनिषदे, तत्त्वज्ञान, विज्ञान, आणि संगीत अशा अनेक क्षेत्रांवर १३० पेक्षा जास्त ग्रंथांची रचना केली. अवघ्या ३४ वर्षांचे अल्प आयुष्य लाभलेल्या या संताला वारकरी संप्रदायात व विद्वानांमध्ये अत्यंत आदराचे स्थान आहे. संत गुलाबराव महाराज यांनी शेकडो ग्रंथांची निर्मिती करून समाजाला अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड घालणारा नवा विचार दिला. त्यांचा हाच पुरोगामी विचार आणि वारसा आजच्या पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे.

याप्रसंगी महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, महिला बाल कल्याण सभापती सदिच्छा सोनी, उपसभापती निरंजना लांडगे, शिवसेना गट नेता संदीपसिंग गाडीवाले, साबेर चाऊस, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त अभिजीत वायकोस, उपायुक्त अजितपालसिंघ संधु, सहाय्यक आयुक्त मो. गुलाम सादिक यांच्यासह पालिकेचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बालकांच्या परिपूर्ण विकासासाठी बालसाहित्य महत्त्वाचे -डॉ. सुरेश सावंत

**नांदेड (प्रतिनिधी)-** बालकांच्या परिपूर्ण विकासासाठी बालसाहित्य अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध बालसाहित्यकार तथा शिक्षणतज्ज्ञ डॉ. सुरेश सावंत यांनी केले. लातूर जिल्ह्यातील उदगीर येथील अहिल्यादेवी गार्डन सभागृहात आयोजित माजी गटशिक्षणाधिकारी बालाजी बिरादार यांच्या 'बोलका ढोल' आणि 'मॅडम मॅडम शाळा सोडा' या दोन पुस्तकांच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लेखिका तथा माजी प्राचार्या मैनाताई साबणे ह्या होत्या. व्यासपीठावर लेखक बालाजी बिरादार आणि सौ. बिरादार यांची उपस्थिती होती. डॉ. सावंत पुढे म्हणाले की, बालकांना बालसाहित्य वाचनाने अनुभवाचे आणि कल्पनेचे पंख फुटतात. बालकांची विनोदबुद्धी जागृत होते. त्यांची विचारप्रक्रिया गतिमान होते. त्यांच्या मानसिक शक्तींचा विकास होतो. त्यांना जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन मिळतो. बालकुमारांचे आत्मभाव आणि आत्मभान जागे होते. घटना व घडामोडींना प्रतिसाद देण्याची दृष्टी मिळते. हे सर्व फक्त बालसाहित्य वाचनाने होते. त्यासाठी उत्तम बालसाहित्य निर्मिती होणे ही काळाची गरज असून बालाजी बिरादार यांचे बालसाहित्य बालकांच्या विकासासाठी उपयुक्त आहे, असेही ते म्हणाले.

प्रारंभी सौ. तोंडचिरकर आणि कु. अवनी स्वामी यांच्या स्वागतगीताने पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर दोन्ही पुस्तकांचे प्रकाशन डॉ. सुरेश सावंत यांच्या हस्ते संपन्न झाले. मुरलीधर जाधव यांनी प्रास्ताविक केले, तर लेखक बालाजी बिरादार यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर अनंत कदम, डॉ. सुरेश सावंत, सौ. मैनाताई साबणे यांनी दोन्ही पुस्तकांवर सविस्तर भाष्य केले. कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन तुळशीदास बिरादार यांनी केले, तर माजी प्राचार्य मोहनराव निडवंचे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# किनवट तालुक्यात जूनअखेर सरासरीपेक्षा १० टक्के अधिक पाऊस

**किनवट (प्रतिनिधी) -**पूर्वमोसमी पावसाची हजेरी, मान्सूनच्या आगमनानंतर काही दिवस पडलेला खंड आणि जूनच्या अखेरीस पुन्हा वाढलेला पावसाचा जोर, यामुळे किनवट तालुक्यात यंदा जूनअखेर २०८.७० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. ही सरासरी १८९.५० मिलिमीटरच्या तुलनेत केवळ १०.२० टक्के अधिक आहे. विशेष म्हणजे, गेल्या काही वर्षांतील असमान पावसाच्या तुलनेत यंदा तालुक्यातील सर्व महसुली मंडळांमध्ये जवळपास समान प्रमाणात पाऊस झाल्याने खरीप हंगामासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे.

तालुक्यात जूनअखेर सरासरी १८९.५० मिलिमीटर पाऊस अपेक्षित असतो. गेल्या पाच वर्षांच्या आकडेवारीनुसार जून २०२५ मध्ये २५३.९०, जून २०२४ मध्ये १८८.७०, जून २०२३ मध्ये केवळ ५०.५०, जून २०२२ मध्ये १५८.२०, तर जून २०२१ मध्ये २७३.६० मिलिमीटर पावसाची नोंद झाली होती. यापैकी २०२१ आणि २०२५ ही दोन वर्षे वगळता इतर वर्षांत सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला होता. यंदा जून महिन्यात ३० पैकी केवळ १२ दिवसच पाऊस झाला, तर उर्वरित १८ दिवस पावसाने दडी मारली होती. तरीही महिन्याच्या अखेरीस झालेल्या दमदार पावसामुळे सरासरीची भरपाई झाली. यंदा प्रशांत महासागरातील हवामानस्थिती आणि अल्नीनोच्या संभाव्य संकटामुळे मान्सूनबाबत व्यक्त झालेल्या विविध अंदाजांच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील पर्जन्यमान समाधानकारक ठरले आहे. त्याचा परिणाम जलसाठ्यांवरही दिसून येत आहे. तालुक्यातील एकूण २१ जलप्रकल्पांमध्ये सध्या १७.४१ टक्के उपयुक्त जलसाठा उपलब्ध आहे.

नागझरी, लोणी आणि डोंगरगाव या तीन मध्यम प्रकल्पांमध्ये सध्या ३७.८० टक्के उपयुक्त जलसाठा असून, तीन आठवड्यांपूर्वी तो २५.२५ टक्के होता. म्हणजेच या कालावधीत तब्बल १२.५५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. मात्र १५ लघुप्रकल्पांपैकी कुपटी, थारा, सिंदगी, हुडी, नंदगाव, अंबाडी आणि सावरगाव या सात प्रकल्पांमध्ये अद्यापही उपयुक्त जलसाठा शून्य आहे. उन्हाळ्यातील तीव्र बाष्पीभवन, काही प्रकल्पांतील गळती आणि तांत्रिक कारणांमुळे या प्रकल्पांमध्ये मुबलक पाऊस झाल्यानंतरच जलसाठ्यात लक्षणीय वाढ होत असल्याचे जलसंपदा विभागातील सूत्रांनी सांगितले. उर्वरित आठ लघुप्रकल्पांमध्ये सध्या २५.३५ टक्के उपयुक्त जलसाठा असून, गेल्या तीन आठवड्यांत त्यात केवळ ०.२५ टक्क्यांचीच वाढ झाली आहे.

## जलसाठ्यांना दमदार पावसाची प्रतीक्षा

जून महिन्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस होऊनही बहुतांश जलप्रकल्प अद्याप पूर्ण क्षमतेपासून दूर आहेत. खरीप पिकांची वाढ, सिंचनाची उपलब्धता, पिण्याच्या पाण्याची सुरक्षितता आणि भूजल पुनर्भरणाच्या दृष्टीने जुलै व ऑगस्टमधील सातत्यपूर्ण व दमदार पाऊस अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून, आता शेतकरी आणि प्रशासनाच्या नजरा पुढील मान्सूनच्या वाटचालीकडे लागल्या आहेत.

निराळा, लक्कडकोट आणि सिंदगी येथील साठवण तलावांमध्ये तीन आठवड्यांपूर्वी ४६.६२ टक्के जलसाठा होता. त्यात वाढ होण्याऐवजी सध्या तो ४३.३९ टक्क यांवर घसरला आहे. या तलावांतील पाण्याचा वापर भूजल पुनर्भरण, जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासह स्थानिक गरजांसाठी केला जातो. दरम्यान, मोहपूर आणि येंदा येथील उच्च पातळीच्या बंधाऱ्यांमध्ये अनुक्रमे ८४.०३ व ८३.९८ टक्के जलसाठा असून, त्यामध्ये फारसा बदल झालेला नाही.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com